




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक २३३ * नांदेड * मंगळवार, दि. १ सप्टेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


## देवदर्शनाहून परतताना काळाचा घाला

# इस्लापूरजवळ कमांडर जीप झाडावर आदळली; चौघांचा जागीच मृत्यू, ६ गंभीर

**नांदेड/ इस्लापूर (प्रतिनिधी)–** किनवट तालुक्यातील कैलास टेकडी व सहस्त्रकुंड येथे महादेवाचे दर्शन घेऊन तेलंगणाकडे परतणाऱ्या भाविकांच्या वाहनाला भीषण अपघात झाला. दिपला नाईक तांड्याजवळ सोमवार, दि. ३१ ऑगस्ट रोजी सायंकाळी भरधाव कमांडर जीप झाडावर आदळल्याने ४ जणांचा मृत्यू झाला असून ६ जण गंभीर जखमी झाले आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, तेलंगणा राज्यातील पारडी (बी) येथील भाविक सोमवार, दि. ३१ ऑगस्ट रोजी कैलास टेकडी येथे दर्शनासाठी आले होते. दुपारी १२ वाजता ते सहस्त्रकुंडकडे रवाना झाले. दर्शन घेऊन सायंकाळी ४.३० वाजता महिंद्रा कमांडर (क्र. ए.पी. २५ ए.एच. ६७४७) ने ते परतीच्या प्रवासाला निघाले होते.

दिपला नाईक तांड्याजवळ चालकाचे नियंत्रण सुटल्याने वाहन रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर जोरात आदळले. धडक इतकी भीषण होती की, वाहनाचा चक्काचूर झाला. या अपघातात तुम सायलू (वय ७०), तुम गौराबाई (वय ६०), आऊला गंगन्ना (वय ७५, तिघेही रा. पारडी-बी) यांचा जागीच मृत्यू झाला, तर गंभीर जखमी चालकाचा रुग्णालयात नेताना वाटेत मृत्यू झाला.

अपघातात अन्य ६ जण गंभीर जखमी झाले असून त्यांना खासगी वाहनांनी तेलंगणा राज्यातील म्हैसा येथील रुग्णालयात हलविण्यात आले आहे. माहिती मिळताच नातेवाईक, तेलंगणा पोलीस व रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाली होती.

# आम्ही मुंबईला जाण्याची तयारी करतोय, मराठा समाजाने १२ तारखेपर्यंत मुंबईला जावे

## मनोज जरांगे पाटील यांची घोषणा



**मुंबई (प्रतिनिधी)–** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा सोमवारी तिसरा दिवस होता. सरकारच्या अधिकृत शिष्टमंडळाची प्रतीक्षा अद्याप कायम आहे. इकडे उपोषणाचा तिसरा दिवस उजाडला तरी सरकारकडून कोणतीही ठोस चर्चा झाली नसल्याने मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला मुंबई कूच करण्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत.

मनोज जरांगे पाटील म्हणाले, आम्ही मुंबईला जायची तयारी करतोय. मराठा समाजाला सांगतो १२ सप्टेंबरपर्यंत हळूहळू मुंबईला जा. आपल्या सोयीनुसार तिथे रहा, फक्त आझाद मैदानावर जाऊ नका. मराठे मुंबईत आलेले त्यांना कळले नाही पाहिजे. पाहुणे, मित्र यांच्याकडे रहा. पोलिसांनी तुम्हाला जर उचलून नेले तर बिनधास्त पोलीस स्टेशनला जा, उलट तिथे चांगली सोय होते. उपोषण सोडणार नाही, मी बरोबर मुंबईत जातो, अशी घोषणा त्यांनी केली आहे.

मनोज जरांगे पाटील पुढे म्हणाले की, सगळे सोबत जाणे शक्य नाही. सरकारकडून कोणीही संपर्क साधलेला नाही. आमचे १२ तारखेला ठरल्यावर जाणार. गणेशोत्सव आपला आहे, आम्ही ११ दिवस गणपती बसवतो ते दीड दिवस बसवतात आणि ते आम्हाला देव-देव शिकवतात, आमच्या एवढं पुण्य कोण करतं, असे देखील त्यांनी म्हटले. मंत्री उदय सामंत यांच्या संभाव्य दौऱ्यावर आणि सरकारच्या संपर्कावर प्रतिक्रिया देताना जरांगे पुढे म्हणाले, २४ तासात संपर्क साधू म्हणजे पावसासारखं आहे का, हळूहळू सरी पडणार. पोराहो आपले मुंबईचे सुरू करा, असे त्यांनी म्हटले.

दरम्यान, परभणीचे खासदार संजय (बंडू) जाधव यांनी रविवारी आयोजित केलेला शेतकरी मेळावा रद्द करण्याचा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी दिला होता, तरीही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हा मेळावा पार पाडला. याबाबत विचारले असता मनोज जरांगे पाटील म्हणाले की, एकनाथ शिंदे यांनी दौरा रद्द केला होता. पुन्हा १० मिनिटांनी कोणत्या तरी अधिकाऱ्यांनी जरांगे पाटलांनी सूट दिली असा मॅसेज त्यांना दिला. त्यामुळे ते आले. आम्ही भिडलो असतो तर एकनाथ शिंदे यांना पळायला सुद्धा जागा राहिली नसती, असे त्यांनी म्हटले.

## अमित ठाकरे यांच्यावर गुन्हा दाखल

**पुणे (प्रतिनिधी)–** अमित ठाकरे यांच्यावर सोमवारी पुण्यातील महाविद्यालय मधील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोटो हटवल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. अमित ठाकरे यांच्यासहित २५ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार चतुश्रृंगी पोलिसांनी सोमवारी संध्याकाळी पाच वाजताच्या सुमारास अमित ठाकरे यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला.

# तेलंगणा पोलिसांवर हल्ला करणाऱ्या दोन आरोपींना अटक

**किनवट (प्रतिनिधी)–** तेलंगणाच्या बाजार हातनूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गुन्ह्यातील फरार आरोपीला ताब्यात घेऊन जाणाऱ्या तेलंगणा पोलिसांच्या पथकावर हल्ला केल्याची घटना घडली. या घटनेतील लाठ्या-काठ्या व दगडांनी हल्ला करून बेडीसह पळून गेलेला आरोपी व त्याच्या भावाला सोमवार, दि.३१ ऑगस्ट सकाळी किनवट पोलिसांनी अटक केली.



तेलंगणाच्या आदिलाबाद जिल्ह्यातील बाजार हातनूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोटारसायकली चोरी प्रकरणात फरारी असलेल्या शेख बकर उर्फ जाफर शेख रा.चिखली ता. किनवट याला तेलंगणा पोलिसांनी रविवारी सायंकाळी अटक केली. त्यानंतर त्या आरोपीला तेलंगणाकडे नेत असताना किनवट - नांदेड रस्त्यावरील चिखली फाट्यावर ५० ते ६० जणांच्या जमावाने तेलंगणा पोलिसांच्या वाहनावर दगडफेक करीत आरोपीला पळवून नेले. याप्रकरणी रात्री उशिरा किनवट पोलीस ठाण्यात फरार आरोपीसह अन्य ५० ते ६० जणांविरुद्ध खुनाच्या प्रयत्नासह विविध गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांवरील हल्ल्यानंतर चिखली गावात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मिळालेल्या महितीवरून किनवटचे पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी सोमवारी दि.३१ सकाळी शेख बकर व त्याचा भाऊ शेख सोनु यांना चिखली येथील एका घरातून अटक केली. या प्रकरणाचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक जाधव करीत आहेत.

# मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी लोहा तालुक्यात एकाची आत्महत्या

**नांदेड (प्रतिनिधी)–** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्टपासून निर्णायक आंदोलन सुरू केले आहे. सोमवारी आंदोलनाचा तिसरा दिवस असतानाच नांदेड जिल्ह्याच्या लोहा तालुक्यात एकाने आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर शासनाकडून होत असलेल्या दुर्लक्षामुळे लोहा तालुक्यातील मराठा बांधव दामोदर रामचंद्र काळे (वय ३५) हे अत्यंत अस्वस्थ होते. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाबाबत आणि मराठा समाजाच्या मागण्यांबाबत त्यांनी गावातील नागरिकांशी चर्चा केल्याचे सांगण्यात येत आहे. गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, रविवारी दिवसभर मराठा आंदोलनाकडे होत असलेल्या कथित दुर्लक्षाबाबत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. सरकार आपल्याला काहीच देणार नाही. रोज जरांगे पाटील मरत आहेत, पण सरकारला काहीच पडलेले नाही. मराठ्यांच्या पुढच्या पिढ्या उद्धवस्त होतील, तरीही सरकार केवळ राजकारण करत आहे, अशा आशयाची व्यथा त्यांनी व्यक्त केल्याचे गावकऱ्यांनी सांगितले.

या घटनेनंतर गावकऱ्यांनी शासनाच्या भूमिकेबाबत तीव्र संताप व्यक्त केला आहे. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार बंडू जाधव यांच्यासह संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी काही गावकऱ्यांनी केली असल्याचे सांगण्यात येत आहे.

# डीआयजी उमाप यांच्या पथकाची अवैध वाळूविरुध्द कारवाई

## १ कोटी ३५ लाख रुपयांची साधनसामुग्री व वाळू जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीविरुद्ध मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त होत आहेत. या पार्श्वभुमीवर पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या पथकाकडून अवैध वाळूविरूद्ध कारवाई करत १ कोटी ३५ लाख रूपयांची साधनसामुग्री व वाळू जप्त केली आहे.

दि. ३० ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजता वाहेगाव शिवारातील वाळू धक्क्यावर कारवाई केली असता, सदर ठिकाणी इंजिन बोटच्या सहाय्याने नदी पात्रातून वाळू उपसा होत असल्याचे व सदर वाळू एका फायबर बोटीतून नदीकिनारी आणली जात असल्याचे निदर्शनास आले. सदर कारवाईत पथकाने, एक इंजिन बोट, एक फायबर बोट, वाळूने भरलेले (१७) तराफे यांच्यासहित, (२) हायवा, एक गउइ मशीन व नदीपात्रातून बाहेर काढून ठेवलेली (१००) ब्रास वाळू, असा एकूण १ कोटी ३५ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नमूद प्रकरणात (६) आरोपींविरुध्द कारवाई करून, त्यांच्याविरुध्द नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे येथे गुरनं १०८६/२०२६ कलम ३०३ (२), ३(५) भा.न्या.सं. सह कलम ४८ (७), ४८ (८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ९,१५ पर्यावरण (संरक्षण) अधिनियम व ३, ७ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा नोंदविला आहे.

सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांच्यासह पोहेकॉ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ गणेश राठोड, पोहेकॉ संदिप वाघाडे व पोहेका गजानन डवरे यांनी सहभाग घेतला, पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे कौतुक केले.

# महापालिकेत कारवाई: कार्यालयीन वेळेत गैरहजर असणाऱ्या ५४ कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस!

**नांदेड (प्रतिनिधी)–** महानगरपालिकेच्या कामकाजामध्ये शिस्त, एकरूपता आणि सेवेची गुणवत्ता राखणे तसेच नागरिकांना जलद व कार्यक्षम सेवा उपलब्ध करून देणे या उद्देशाने मनपा प्रशासनाने सोमवारी धडक कारवाई केली आहे. महानगरपालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या आदेशान्वये करण्यात आलेल्या अचानक तपासणीत कार्यालयीन वेळेत गैरहजर आढळलेल्या तब्बल ५४ कर्मचाऱ्यांना 'कारणे दाखवा' नोटीस बजावण्यात आली आहे.


महानगरपालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, कार्यालयीन शिस्त व सेवेची गुणवत्ता राखण्यासाठी शासनाच्या नियमांनुसार कर्मचाऱ्यांनी वेळेचे पालन करणे सक्तीचे आहे. ज्यामध्ये वर्ग-३ संवर्गातील कर्मचारी सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ या वेळेत कार्यालयात हजर राहणे बंधनकारक आहे. तर वर्ग-४ संवर्गातील कर्मचारी सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.३० या वेळेत कार्यालयात हजर राहणे आवश्यक आहे. याशिवाय, कर्तव्यावर असताना प्रत्येक कर्मचाऱ्याकडे त्याचे अधिकृत ओळखपत्र असणे अनिवार्य आहे. तसेच वर्ग-४ संवर्गातील सर्व कर्मचाऱ्यांनी शासनाने निर्धारित केलेल्या राष्ट्रीय गणवेशातच उपस्थित राहणे आवश्यक आहे.

प्रशासकीय कामकाजात गतिशीलता आणण्यासाठी आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त अभिजित वायकोस यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष 'तपासणी पथक' गठीत करण्यात आले आहे. या पथकाने सोमवार दिनांक ३१ ऑगस्ट रोजी सकाळी कार्यालयीन वेळेत महानगरपालिकेच्या विविध विभागांची औचक पाहणी केली. या तपासणी दरम्यान शासनाने ठरवून दिलेल्या वेळेचे उल्लंघन करून एकूण ५४ कर्मचारी कार्यालयात वेळेवर हजर नसल्याचे आढळून आले. कार्यालयीन नियमांचे आणि शिस्तीचे उल्लंघन करणाऱ्या या सर्व ५४ कर्मचाऱ्यांची गंभीर दखल घेत प्रशासनाने त्यांना तात्काळ 'कारणे दाखवा' नोटीस जारी केली आहे.

नोटीस मिळाल्यापासून २४ तासांच्या आत लेखी खुलासा सादर करावा. विहित मुदतीत समाधानकारक खुलासा न आल्यास संबंधित कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कडक प्रशासकीय व दंडात्मक कारवाई केली जाईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

### नागरिकांच्या सेवेला प्राधान्य –मनपा

महानगरपालिका हे नागरिकांना मूलभूत सेवा देणारे मुख्य केंद्र आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांची लेट-लतीफी, गणवेश व ओळखपत्राबाबतचा हलगर्जीपणा अजिबात सहन केला जाणार नाही. प्रशासकीय कामात पारदर्शकता, वेळ आणि शिस्त राखण्यासाठी अशा प्रकारच्या औचक तपासण्या यापुढेही सातत्याने सुरू राहतील, असे मनपा प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.



# पोलिसांवर विश्वास वाढवण्यासाठी डीआयजींचा 'जनसंवाद'

## नांदेडमध्ये ३७ तक्रारदारांच्या व्यथा ऐकल्या, तात्काळ कारवाईचे आदेश

**नांदेड (प्रतिनिधी)–** तुमची तक्रार थेट वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचणार! नागरिकांच्या तक्रारी जलद निकाली काढण्यासाठी आणि पोलीस- नागरिकांतील दरी कमी करण्यासाठी नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी 'जनसंवाद' उपक्रम सुरू केला आहे. याअंतर्गत दि. ३१ ऑगस्ट रोजी ३७ तक्रारदारांच्या व्यथा ऐकून त्यावर कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत.



**नांदेडमध्ये ३७ तक्रारींवर सुनावणी**

दि. ३१ ऑगस्ट रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड येथे मासिक आढावा बैठकीनंतर दुपारी ३ ते ५.३० या वेळेत पोलीस उपमहानिरीक्षक उमाप यांनी तक्रारदारांशी संवाद साधला. यावेळी एकूण ३७ नागरिकांनी लेखी अर्ज दिले. मालमत्ता वाद, हरवलेले व्यक्ती, मारहाण, दाखल गुन्ह्यांच्या तपासातील दिरंगाई, पोलीस संरक्षण आणि अवैध धंद्यांबाबतच्या तक्रारींचा समावेश होता.

सर्व तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित एसडीपीओ व ठाणे प्रभारींना तात्काळ कार्यवाहीच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**'संवेदना' पोर्टलवरून पाठपुरावा होणार**

तक्रारींच्या जलद निवारणासाठी डीआयजी कार्यालयाने 'संवेदना' ही विशेष तक्रार निवारण प्रणाली सुरू केली आहे. जनसंवादमध्ये आलेले सर्व अर्ज या पोर्टलवर अपलोड करून संबंधित अधिकाऱ्यांकडे वर्ग केले जाणार असून, प्रत्येक तक्रारीवर झालेल्या कारवाईचा आढावा परिक्षेत्र कार्यालयातील फीडबॅक टीम घेणार आहे.

यावेळी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर व्यंजने, इतवाराचे प्रशांत शिंदे, बिलोलीचे श्याम पानेगावकर, ग्रामीणचे माणिक बेद्रे, भोकरचे जगदीश भंडरवार यांच्यासह जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, एलसीबीचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले, वजिराबादचे अजित कुंभार, भाग्यनगरचे संतोष तांबे, शिवाजीनगरचे राजेश पुरी, विमानतळचे रामदास शेंडगे, इतवाराचे रामेश्वर खनाळ, नांदेड ग्रामीणचे ओमकांत चिंचोलकर आदी ठाणे प्रभारी उपस्थित होते.

## समृद्धी महामार्गावर १८ लाखांचा दरोडा टाकणारी टोळी पोलिसांच्या जाळ्यात

**नाशिक (प्रतिनिधी)–** समृद्धी महामार्गावर सिन्नरजवळील घटनेत १८ लाखांच्या दरोडा प्रकरणातले आरोपी पोलिसांनी जेरबंद केले. नाशिक ग्रामीण पोलिसांनी तपासचक्रे वेगाने फिरवत ७ आरोपींच्या अवघ्या ४८ तासांमध्ये मुसक्या आवळल्या आहेत. या घटनेतील ७ जणांना अटक केली असून ५ जण अद्याप फरार आहेत. दरोडेखोरांची टोळी धाराशिवमधील असल्याची माहिती समोर आली आहे.

समृद्धी महामार्गावर सिन्नर तालुक्यातील मलढोण आणि दुशिंगपूर दरम्यानच्या परिसरात दरोडेखोरांनी रस्त्यावर धारदार वस्तूंनी एका धावत्या कारचे टायर फोडले. या कारमधील एका वकिलाच्या कुटुंबाला मारहाण करून दरोडेखोरांनी १८ लाखांचा ऐवज चोरला आणि पसार झाले. राज्याची ओळख झालेल्या समृद्धी महामार्गावर अशी घटना घडल्याने एकच खळबळ उडाली होती. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता नाशिक ग्रामीण पोलिसांनी पथके नेमून तपास सुरू केला. नाशिक ग्रामीण पोलिसांनी ४८ तासात आरोपींना जेरबंद केले. पोलीस अधीक्षक डी. एस. स्वामी यांच्या नेतृत्वात ही धडाकेबाज कारवाई केली.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# हिमालयातील महाप्रलयाचा इशारा

नेपाळ आणि तिबेटच्या सीमावर्ती हिमालयीन भागात आलेल्या भीषण महापुराने संपूर्ण जगाला हादरवून सोडले आहे. हिमनदी कोसळल्याने निर्माण झालेल्या प्रचंड पुराच्या लोंढ्याने गावं, रस्ते, पूल आणि जलविद्युत प्रकल्प अक्षरशः उद्ध्वस्त केले. शेकडो जणांचा मृत्यू झाला असून, तीन हजारांहून अधिक लोक बेपत्ता असल्याचे वृत्त आहे. हजारो सुरक्षा जवान आणि बचाव पथके जीव धोक्यात घालून मदतकार्य करीत आहेत. ही घटना केवळ नेपाळची आपत्ती म्हणून पाहून चालणार नाही. हिमालयाच्या कुशीत घडणाऱ्या प्रत्येक मोठ्या नैसर्गिक घटनेचे पडसाद भारताच्या पर्यावरणीय आणि जलसुरक्षेवर उमटू शकतात. त्यामुळे या दुर्घटनेतून भारताने वेळीच धडा घेणे आवश्यक आहे. या महापुरामागे नेमके कारण काय? प्राथमिक माहितीनुसार हिमनदीचा मोठा भाग कोसळल्याने बर्फ, दगड आणि चिखलाचा प्रचंड प्रवाह नदीत मिसळला आणि त्यातून अचानक महापूर निर्माण झाला. मात्र केवळ एवढे सांगून प्रश्न संपत नाही. हिमालयातील वाढते तापमान, हिमनद्यांचे वेगाने वितळणे, भूस्खलन, अनियंत्रित बांधकाम, जंगलतोड आणि पर्यावरणीय संतुलनाचा बिघाड यामुळे अशा घटनांची तीव्रता वाढू शकते. तज्ज्ञांच्या मते, या दुर्घटनेत नैसर्गिक आणि मानवनिर्मित अशा अनेक घटकांचा एकत्रित परिणाम दिसतो. म्हणूनच विकासाच्या नावाखाली हिमालयाच्या नाजूक पर्यावरणाशी खेळण्याची वेळ आता संपली पाहिजे. रस्ते, धरणे, जलविद्युत प्रकल्प आणि इतर पायाभूत सुविधा आवश्यक असल्या तरी त्यांची उभारणी करताना पर्यावरणीय वहनक्षमता, भूकंपीय संवेदनशीलता आणि संभाव्य आपत्ती यांचा गांभीर्याने विचार झाला पाहिजे. याच संदर्भात भारतासाठी आणखी एक गंभीर प्रश्न उपस्थित होतो की, चीनकडून यारलुंग त्सांगपो नदीवर उभारला जात असलेला महाकाय जलविद्युत प्रकल्प. हीच नदी भारतात अरुणाचल प्रदेशात सियांग आणि पुढे आसाममध्ये ब्रह्मपुत्रा म्हणून वाहते. या प्रकल्पामुळे नदीच्या नैसर्गिक प्रवाहात बदल होण्याची, पर्यावरणावर परिणाम होण्याची आणि भविष्यातील पूरस्थितीबाबत अनिश्चितता निर्माण होण्याची चिंता भारतात व्यक्त केली जात आहे. भारत सरकारनेही या घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवले असल्याचे स्पष्ट केले आहे. मात्र येथे एक महत्त्वाची बाब स्पष्टपणे सांगणे आवश्यक आहे. नेपाळमधील सध्याचा महापूर चीनच्या धरणामुळे झाला, असे म्हणण्याचा कोणताही आधार उपलब्ध नाही. त्याचा तत्कालिक कारणीभूत घटक हिमनदी कोसळणे हा असल्याचे अहवाल सांगतात. त्यामुळे नेपाळच्या दुर्घटनेचा थेट संबंध अरुणाचलजवळील चिनी धरणाशी जोडणे योग्य ठरणार नाही. पण या घटनेने हिमालयातील मोठ्या जलस्रोतांवर मानवी हस्तक्षेप वाढत असताना आपत्ती व्यवस्थापन आणि सीमापार जलसुरक्षेबाबत किती मोठी तयारी आवश्यक आहे, हे निश्चितपणे दाखवून दिले आहे. भारत सरकारने आता केवळ प्रतिक्रिया देण्याऐवजी पूर्वतयारीवर भर दिला पाहिजे. चीनकडून नदीच्या पाण्याच्या प्रवाहाची माहिती, जलाशयातील पाण्याची स्थिती आणि आपत्कालीन परिस्थितीतील माहिती तातडीने मिळण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभी केली पाहिजे. अरुणाचल प्रदेश आणि आसाममध्ये अत्याधुनिक पूरपूर्व सूचना प्रणाली, उपग्रह निरीक्षण, नदीपातळी मोजणी केंद्रे आणि स्थानिक प्रशासनाची आपत्कालीन क्षमता वाढवली पाहिजे. हिमालय आपल्याला वारंवार इशारे देत आहे. प्रश्न एवढाच आहे की, आपण ते इशारे ऐकणार आहोत की आणखी एखाद्या महाप्रलयाची वाट पाहणार आहोत? नेपाळची शोकांतिका ही केवळ एका देशाची आपत्ती नाही; ती संपूर्ण हिमालयीन प्रदेशासाठी धोक्याची घंटा आहे. निसर्गाला आव्हान देण्याऐवजी त्याच्यासोबत संतुलन साधणे आणि राष्ट्रीय सुरक्षेइतक्याच गांभीर्याने जलसुरक्षेकडे पाहणे, हीच आजची खरी गरज आहे.

# कृतज्ञता हे जगण्याचे भूषण

आजच्या धकाधकीच्या जीवनात काही मनुष्य कोणालाही जुमानत नाहीत, आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात माझ्या एवढे कोणीही हुशार नाही अशी अहंकार रूपी भावना अनेक जणमाणसात निर्माण झाली आहे. त्यासाठी कृतघ्न होण्याऐवजी कृतज्ञ व्हावे म्हणून हा लेखन प्रपंच...



आव्हान किंवा संकटाच्या वेळी कृतज्ञता ही खरोखर जीवनरेखा बनते. कृतज्ञता हे नवीन आशीर्वादाचे प्रवेशद्वार आहे. हा इतरांच्या सौजन्याचा स्वीकार करण्याचा एक सकारात्मक मार्ग आहे. धन्यवाद हा शब्द कृतज्ञता दर्शवतो. आणि बरेच लोक कृतघ्न वागतात? मग माणूस म्हणतो साधे आम्हाला त्यांनी धन्यवाद सुद्धा म्हटले नाही कृतज्ञता हा इतरांच्या सौजन्याचा स्वीकार करण्याचा एक सकारात्मक मार्ग आहे. ही एक पवित्र चांगली कृती आहे. कष्टाचे संघर्षात आणि निराशेचे आशेत रूपांतर होते. झाड कितीही वाढले तरी त्याने मातीशी बेईमानी करू नये. कारण त्याचे अस्तित्व मातीवरच उभे असते. कृतज्ञता म्हणजे फक्त उपकाराची जाणीव नव्हे, प्रत्येक माणूस कोणाच्या तरी सहकार्याने मदतीने ,भावनेच्या आधारावर जीवन जगत असतो. एकटा मनुष्य कधीच सुखी जीवन जगू शकत नाही.

जो आपणाला सहकार्याच्या भावनेतून आपल्याला पावलोपावली मदत करतो

. या सर्व बाबतीत कृतज्ञ राहणे म्हणजे धर्म होय. आपल्या सभोवतालच्या प्रदेशाला आपण पर्यावरण म्हणतो. माती, वारा, पाणी या मोठ्या नैसर्गिक शक्ती आहेत. त्या आपल्याला जीवनात आनंद देतात. निसर्गाच्या सानिध्यात आपणाला खळखळून हसवितात, आपण या गोष्टीचा कधीही विचार करीत नाही, त्या आपणास आपोआप मिळतात. त्यामुळे त्या गोष्टीची आपण कृतज्ञता पाळावी. हाच आपला खरा धर्म आहे.आपल्या जीवनात सतत अंधार असून चालत नाही, प्रकाश नसल्याने माणूस जिवंत राहतो, पण सुख उपभोगू शकत नाही, म्हणून प्रकाशाची जीवनात आपणाला आवश्यकत आहे .त्यामुळे त्यांच्याविषयी आपल्या मनात कृतज्ञतेची भावना नेहमी असावी, माणसाच्या मनातील भावना कृतज्ञतेची असून ती रोम रोमांत भिनलेली असावी, त्यामुळे आपल्या जीवनाला आकार येतो. आपल्यावर ज्यांनी ज्यांनी उपकार केले. त्यांच्या विषयी आपल्या मनात कृतज्ञतेची भावना जरूर असावी. ज्यांनी आपल्याला एवढे मोठे शरीर दिले, त्यामुळे आपणाला त्यांची सेवा करता यावी, त्यांच्या कृतज्ञतेची जाणीव असावी, अगोदर लग्न कोंढाण्याचे नंतर रायबाचे, घडलेली घटना दु:खी होती. म्हणून छत्रपती शिवाजी महाराज रायबाच्या घरी कुटुंबाला भेटण्यासाठी गेले यालाच कृतज्ञता म्हणतात. शाळेत मुलांना सर्व शिक्षक शिकवितात,त्यांना ज्ञान देतात,आई, वडील, गुरु, मित्र ,नातेवाईक, मार्गदर्शक हे सर्वजण आपल्या जगण्याला बळ देतात. म्हणून कृतज्ञता पाळावी. भारत हा कृषिप्रधान देश आहे.येथे बैलांच्या साह्याने शेती केली जाते, वर्षभर बैल शेतीमध्ये राबराब राबवून आपल्याला अन्नधान्य मिळून देतो, म्हणून बैला प्रती आपण पोळा हा सण साजरा करून कृतज्ञता व्यक्त करतो. म्हणून परस्परांशी भावना अशा असाव्यात हे सांगता येते. आपल्याबद्दल प्रेम,भक्ती,आपुलकी दाखवणे यालाच कृतज्ञता म्हणतात, संतांनी सुद्धा देवाशी एकरूपता दाखविले, वारी मधून ते सगळे एकत्र येऊन परमेश्वराशी कृतज्ञता पाळतात.

एखाद्या वेळी आपणाला दुसऱ्याचे आभार किंवा धन्यवाद मानावे लागतात, शब्दातून कृतज्ञता व्यक्त करता येते .म्हणून कृतज्ञता हे जगण्याचे भूषण आहे. संतश्रेष्ठ नरहरी सोनार म्हणतात *देवा मी तुझा सोनार। तुझ्या नामाचा व्यवहार।*।तसेच संत तुकाराम महाराज

देह जावो अथवा राहो। पांडुरंगी दृढ भावो।। आणि संत चोखोबा महाराजांनी जोहार मायबाप जोहार असे म्हणून कृतज्ञता व्यक्त केली आहे. ते आपल्या शब्दातून व्यक्त केल्यामुळे मनाला उभारी येते. रामायणामध्ये संपूर्ण वानरसेनानी सेतू बांधून काढल्यानंतर प्रभू श्रीरामाने सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. एकमेकाबद्दल चांगल्या भावना व्यक्त करणे यालाच कृतज्ञता म्हणतात. ती वयावर अवलंबून नसते, कधी कधी आई आपल्या बाळाजवळ लाडालाडाने म्हणते *बाळा होऊ कशी मी उत्तराई। तुझ्यामुळे मी झाले आई।। ही कृतज्ञता भावनेतून आपोआप येते म्हणून तिला विसरता येत नाही, यशस्वी आणि परिपूर्ण जीवन जगण्यासाठी कृतज्ञता हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे.

बीजा मधुनी वृक्ष उगवतो ।
फुलाफळांनी बहरून येतो।।
देत सावली पशुपक्ष्यांना ।
आनंदाने बहरून जातो।।
कृतज्ञता हे असते भूषण।

म्हणून मानवी जीवन जगत असताना आपल्याला ज्यांनी ज्यांनी मदत केली त्यांना तुम्ही धन्यवाद म्हणावे, दातृत्व हे जेव्हा कर्तृत्वाचे साथी बनते, तेव्हा कृतज्ञतेलाही बहर येतो. एखाद्या व्यक्तीने संकटाच्या काळी आपल्याला तेथून बाहेर काढले ,आणि सही सलामत आपला जीव वाचला तर आपण त्यांना तुमचे आयुष्यभर आम्ही ऋणी आहोत,असे सहज बोलून जातो. यामुळे पुढच्या व्यक्तीला अतिशय आनंद वाटतो.आपण केलेल्या कार्याची पावती आपल्याला मिळाली असे त्यांना वाटते. कृतज्ञता ही स्थिर असावी ती एक निष्ठ असावी, तिच्यामध्ये लोभ नसावा, किंवा एखाद्याला थोडी मदत करून त्या मदतीच्या आशेने पुन्हा त्यांच्याकडे तीन तीन वेळेस इतर गोष्टीची मागणी करून त्याला ती पूर्वीची जाणीव करून देऊ नये, तेव्हाच त्या कृतज्ञतेला महत्त्व प्राप्त होते,नाहीतर थोड थोडे देऊन त्यांच्याकडून जास्त काढून घेण्याची हाव सुटते हे या ठिकाणी आवर्जून सांगायचे आहे.

किती क्षणाचं हे आयुष्य असतं,
आज असतं तर उद्या नसतं,
म्हणून ते हसत हसत जगायचं असतं,
कारण येणारे दिवस येत असतात.

जाणारे दिवस जात असतात. येणाऱ्यांना घडवायचं असतं जाणाऱ्यांचे विचार जपायचं असतात. असं हे आयुष्याचं गणित सोडवायचं असतं म्हणून कधीतरी कोणासाठी का होईना? कृतज्ञता पाळत पाळात जीवन हसतखेळत जगायचं असतं. म्हणून तर कृतज्ञतेला जगण्याचं भूषण म्हणतात. शेवटी तुम्ही सर्वजण आमच्या कार्यक्रमाला उपस्थित राहिलात, त्याबद्दल सर्वांचा मी आभारी आहे असे म्हणून आपण कृतज्ञतेतून समारोप करतो.

**–प्रा. विठ्ठल बरसमवाड**
अध्यक्षः
विठूमाऊली प्रतिष्ठान खैरकावाडी
ता. मुखेड जि. नांदेड

# ‘योगी पुरुष सद्गुरू नराशाम महाराज’

सत्पुरुष जिथे जिथे विचरण करतात, तिथली भूमी पुण्यमय होते. आपला भारतदेश हा संतपुरुषांच्या ज्ञानतेजाने उजळून निघाला आहे. महाराष्ट्र भूमी ही ‘संताची भूमी’ म्हणून ओळखली जाते. या भूमीत अनेक ज्ञात, अज्ञात असे योगीपुरुष, संत होऊन गेली. आजही आहेत. संत पुरुष जन्म घेत्तात, ते फक्त जगाच्या कल्याणासाठी. सकल मानवजातीला ज्ञानाचा बोध देवून सन्मार्गाला लावणे, हेच संत्ताचे कार्य. सर्व प्राणीमात्रांचे मंगल चिंतितात ते संत.

गोदावरी नदीचा प्रदेश हा संत सानिध्याने पावन झाला आहे. नांदेड जिल्ह्यातील गोदावरीच्या दक्षिणेस मुखेड तालुक्यातील एक छोटेसे गाव येवती. येवतीला श्रीगुरुनराशाम महाराजांची येवती या नावाने ओळखले जाते. सद्गुरु नराशाम महाराजांच्या संजीवन समाधीमुळे पावन आलेल्या येवतीला ‘लघु आळंदी’ किंवा प्रति आळंदी असे म्हणतात.

श्री सद्गुरु नराशाम महाराज हे जगद्गुरु शंकराचार्य यांचे समकालीन. ते दिव्यतेजधारी योगी पुरुष होते. वनात तप करीत, अरण्यातून विचरण करीत करीत येवती गावी प्रगटले. ब्रम्हचार्याचे कठोर पालन व शिव शिव मुखी अखंड नाम. श्री क्षेत्र बस्वकल्याण येथे त्याचे गुरु श्री शामानंद यांची भेट झाली. गुरूनी पूर्ण ज्ञानाचा खजिना दिला. पूर्णज्ञान प्राप्त करून पुन्हा श्री नराशाम महाराज जनतेच्या कल्याणासाठी येवती येथे आले. त्यांच्या सत्यवचनाने आणि दिव्य तेजामुळे असंख्य भक्तांच्या रांगा लागल्या. संतांच्या संगतीने लोकांचे जीवन सन्मार्गी लागले. परीसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने व्हावे, तसे संतांच्या दर्शनाने, सहवासाने जनतेच्या जीवनाचे सुवर्णतेज उजळू लागले. त्याकाळी जगद्गुरु शंकराचार्य धर्मप्रचारासाठी कुंडलेश्वर मंदिर, (कुंडलवाडी ता. बिलोली जि. नांदेड) येथे आले. त्यांची भेट श्री सद्गुरु नराशाम महाराजांनी घेतली. योग्याची योग्याला खूण पटली व वेदांत चर्चेत अथांग विचरण करू लागली.



संतांना कुठलाच धर्म, जात, पंथ, भेद नसतो. ते सर्वत्र ईश्वराला पाहतात. त्यांना ‘नरसी’ गावी’ खाकशहा नावाचा एक यवन फकीर भेटला. एकमेकांना पाहताच अत्यानंद झाला. ते एकमेकांचे मित्र बनले. बद्रीकाश्रम, काशी, प्रयाग या हिंदू तिर्थक्षत्रांचे दर्शन घेतले व मक्केश्वरी जावून झाले.

श्री सद्गुरु नराशाम महाराजांनी इथले कार्य संपल्याचे सांगून शके सोळाशे त्र्याणव, श्रावण महिन्यातील वद्य पंचमी गुरुवारी संजीवन समाधी घेतली. संजीवन समाधीचा महिमा अपार आहे. संजीवन सोहळ्यानिमित्त दर्शनासाठी सर्व भाविक लोक भक्तिभावाने येऊन नतमस्तक होतात.

त्यांचेच सतशिष्य श्री गोविंद महाराज यांनी पौष महिन्यातील वद्य सप्तमी रोजी संजीवन समाधी घेतली. दोघांच्या संजीवन समाधीमुळे येवतीक्षेत्र पावन झाले आहे. सद्गुरूच्या चरणी कोटी कोटी प्रणाम.

योगी पुरुषोची महिमाच अशी असते –
कुठल्याही भोगाची, इच्छा न ठेवता येती ।
नरदेही येवूनी योगी, जनकल्याण करून जाती ।।

श्री सद्गुरु नराशाम महाराजांवर प्रसन्न झालेल्या माता जगदंबेचे जागृत स्थान आजही येथे आहे. मधुकरीची परंपरा नित्य चालू आहे. ब्रम्हचार्याचे कठोर पालन व नित्य शिव उपासना ही या परंपरेची मुख्य वैशिष्ट्ये. श्री सद्गुरु नराशाम महाराज (आठवे) हे आज या गुरुपदावर आहेत.

पौष वद्य सप्तमीस यात्रा भरते. भक्ताने परिसर फुलतो. गुरुनामात गावोगावच्या दिंड्या नाचत येतात. सप्ताहात किर्तने होतात. पहाटे पालखी गुरूनाम गर्जत गावभर फिरते, घरोघरी दारासमोर सुंदर रांगोळी, दाराला तोरण, शोभते. येवती नगरी भक्तीभावाने दर्शन घेऊन, आरतीकरून गुरुच्या कृपेच्या वर्षावात आनंदीत होते. अणू वाटते की आळंदीच अवतरली. म्हणून तर येवतीला लघु आळंदी (प्रति आळंदी) संबोधतात.


अद्याप पहा जनलोक येती।
प्रसाद तिर्थ सदा मुक्त होती. ।।
महिमा असा हा गुरुच्या पदाचा,।
नमितो पदाला नराशाम साचा.

श्री सद्गुरु नराशाम महाराज आठवे यांच्याकडून आजच्या तरुण पिढीला सन्मार्गाला लावण्याचे काम गुरुच्या कृपेने, संजीवन समाधी माऊली कृपेने होत आहे. प्रतिवर्षी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे श्री पांडुरंग दर्शनासाठी श्री सद्गुरु नराशाम महाराज पायी दिंडी येवती येथून प्रस्थान होते. भाविक भक्तांना श्री सद्गुरु नराशाम महाराज यांच्या कृपेने तीर्थक्षेत्राचे दर्शन आणि सत्संगाचा लाभ दरवर्षी होत आहे. संतांच्या सानिध्याने मानवाच्या पिढ्यान्पिढ्या भक्तीमार्गाला लागतात. सद्गुरुच्या तपाने, ज्ञानाने, चमत्काराने अद्भुत कृपेने येवतीभूमीचे भाग्य उजळले आहे. श्री सद्गुरु नराशाम महाराज मठ संस्थान, येवती हे तिर्थक्षेत्र म्हणून ओळखले जात आहे. अशा सद्गुरुच्या श्री चरणी नमन करून आपलेही भाग्य उजळवू या.

तीरथ नहाए एक फल, संत मिले फल चार ।
सद्गुरु मिले अनंत फल, कहत कबीर विचार ।

**–संगमनाथ पांचाळ**
येवती ता. मुखेड, जि. नांदेड.
मो. क्र. ९४२१९३७८७६

# ‘संस्कृत’ भाषेचे संवर्धन-काळाची गरज!




श्रावण पौर्णिमा हा दिवस राष्ट्रीय संस्कृत दिन म्हणून साजरा केला जातो याची अनेकांना कल्पनाही नाही. केंद्रीय विद्यालय संघटनेने त्रिभाषा सूत्रांतर्गत सर्व शाळांमध्ये इयत्ता सहावी आणि नववीच्या वर्गासाठी संस्कृत विषयाची किमान एक तुकडी ठेवणे अनिवार्य केले आहे. शिक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या या संस्थेने २९ मे रोजी काढलेल्या परिपत्रकानुसार सर्व शाळांना विद्यार्थी आणि पालकांकडून तिसऱ्या भाषेचा पर्याय घेण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यास सांगितले होते. या तिसऱ्या भाषेत संस्कृत किंवा इतर कोणतीही प्रादेशिक किंवा राज्याची भाषा निवडता येईल. बदली होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मुलांची सोय व्हावी म्हणून प्रत्येक शाळेत संस्कृतची किमान एक तुकडी असणे अनिवार्य करण्यात आले आहे.

भारतवर्षाची मूळ भाषा संस्कृत आज दुर्मिळ होत चालली आहे, तर परकीय भाषा इंग्रजी आज देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचली आहे, याला भारताचे दुर्दैव नाही, तर काय म्हणावे? संस्कृत ही सर्वांत प्राचीन भाषा असून भारतीय संस्कृतीची नाळ ज्या प्राचीन वेद उपनिषिदांमध्ये, महाकाव्यांमध्ये दडली आहे ते सर्वच संस्कृत भाषेत आहेत. भारतीय संस्कृतीमध्ये ती उपासनेची भाषा असून या भाषेत अनेक सुभाषितेही आहेत. विख्यात व्याकरणतज्ञ महर्षि पाणिनी यांनी इ.स. पूर्व काळात, म्हणजे साधारण २४०० ते २५०० वर्षांपूर्वी या भाषेचे व्याकरण सिद्ध करून संस्कृत भाषेला प्रमाणित केले.

संस्कृत भाषेतील अनेक शब्द भारतीय भाषांमध्ये जसेच्या तसे योजले जातात. त्यांना ‘तत्सम शब्द’ म्हणतात. संस्कृतमधूनच अन्य भारतीय भाषा जन्मल्या आहेत; म्हणूनच संस्कृत भाषेला ‘सर्व भाषांची जननी’ म्हणले जाते. या भाषेची खरी समृद्धी तिच्यामध्ये रचल्या गेलेल्या अथांग वाययात दडलेली आहे, ज्याचे मुख्य आधारस्तंभ म्हणजे वेद, उपनिषदे आणि पुराणे हे आहेत. जगातील सर्वांत प्राचीन वायय मानले जाणारे ‘वेद’ मानवाला निसर्गाचा आदर करायला आणि कर्तव्याचे पालन करायला शिकवतात. वेदांचे हेच कठीण तत्त्वज्ञान सोपे करून ‘उपनिषदां’मध्ये मांडले गेले आहे, जे व्यक्तीला आत्मज्ञान आणि विश्वाचे अंतिम सत्य शोधण्याचा वैचारिक अन् आध्यात्मिक मार्ग दाखवतात, तर दुसरीकडे ‘पुराणे’ ही सर्वसामान्य लोकांसाठी अत्यंत रंजक आणि सोप्या भाषेत कथांच्या माध्यमातून सदाचार, इतिहास आणि नैतिक मूल्यांची शिकवण देतात.

संस्कृत भाषेतील हा अमूल्य ज्ञानकोश केवळ धार्मिक नसून मानवी जीवनाला वैचारिक समृद्धी आणि जगण्याचा वैज्ञानिक दृष्टीकोन देणारा एक जागतिक वारसा आहे. रामायण, महाभारत, किरातार्जुनीयम्, मेघदूत अशी अनेक काव्ये, महाकाव्य या भाषेला समृद्ध बनवतात. ‘रामायण’ हे सर्वांत प्रथम लिहिलेले काव्य असल्याने त्याला ‘आदिकाव्य’ असेही म्हणतात, तसेच आयुर्वेद, गणित, खगोलशास्त्र आणि योग यांवरील प्राचीन वैज्ञानिक साहित्य संस्कृत भाषेमध्येच उपलब्ध आहे. संस्कृत ही भारताची मूळ भाषा असल्याने तिचे संवर्धन करण्याची गरज असताना तिला आज जाणीवपूर्वक डावलले जात आहे. आजमितीला इंग्रजी माध्यम आणि कॉन्व्हेंट शाळांचे स्तोम भारतात सर्वत्र माजले आहे. मराठी माध्यमांतही पहिली पासून इंग्रजी सक्तीची करण्यात आली आहे. तर दुसरीकडे संस्कृतला पर्यायी भाषेचा दर्जा देण्यात आला आहे. ही पर्यायी भाषा सुद्धा फारच कमी शाळा–महाविद्यालयांमध्ये शिकवली जाते. त्यामुळे संस्कृत भाषा शिकण्याची आवड असूनही शाळा महाविद्यालयांत ती शिकवणे व्यवस्थापनाच्या धोरणात नसल्याने विद्यार्थ्यांना नाईलाजास्तव अन्य उपलब्ध भाषा शिकाव्या लागतात. अनेक महाविद्यालयांत तर फ्रेंच, जर्मन, डच यांसारख्या परकीय भाषा शिकवल्या जातात; मात्र संस्कृत शिकवण्यासाठी शिक्षक भरती केले जात नाहीत.

आज अनेक शाळांमध्ये शाळा भरताना सुरुवातीला संस्कृत भाषेतील श्लोक आणि प्रार्थना घेतल्या जातात; मात्र विद्यार्थ्यांना त्यांचा नीटसा अर्थच कळात नसल्याने ते म्हणताना केवळ पाठांतर केल्याप्रमाणे म्हटले जाते. इंटरनेटच्या मुक्त वापरामुळे आणि इंग्रजी शिक्षणाच्या प्रभावामुळे पाश्चिमात्य संस्कृतीची छाप आज भारतीयांवर मोठ्या प्रमाणात जाणवते. मागील काही वर्षांत उर्दू भाषेच्या संवर्धनासाठी ‘महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी’ला कोट्यवधी रुपयांचा निधी दिला गेला, तर दुसरीकडे संस्कृतच्या पुरस्कारांची मात्र २ लाख रुपयांमध्ये बोळवण करण्यात आल्याचे वृत्त हल्लीच वाचनात आले. सरकारच जर संस्कृत भाषेला समृद्ध करण्याच्या संदर्भात उदासीन असेल तर अपेक्षा तरी कोणाकडून करायची? भारतीय संस्कृतीला तिचे पुनर्वैभव प्राप्त करून द्यायचे असेल, तर किमान इयत्ता पाचवीपासून सर्व माध्यमांच्या शाळांतून संस्कृत विषय सक्तीचा करण्यातची गरज आहे त्यासाठी संस्कृत प्रेमी जनतेने सरकारवर दबाव आणायला हवा!

**–जगन घाणेकर,**
घाटकोपर, मुंबई
मो. ९६६४५५९७८०

# पैठणी साडीवर बारकोड; अस्सलतेला मिळणार सरकारी संरक्षण!



महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेची आणि कलात्मक वारशाची ओळख असलेली पैठणी ही केवळ साडी नसून महाराष्ट्राच्या वस्त्रकलेचा अभिमान आहे. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण रचना, आकर्षक रंगसंगती, जर व रेशमी विणकामामुळे पैठणीला देशभरात मोठी मागणी आहे. मात्र, या वाढत्या मागणीचा गैरफायदा घेत बाजारात बनावट, अर्धवट किंवा कमी दर्जाच्या साड्या ‘पैठणी’च्या नावाखाली विकल्या जाण्याच्या तक्रारी वाढत आहेत. त्यामुळे ग्राहकांची फसवणूक रोखण्यासाठी पैठणीवर बारकोड आणि लोगो देण्याचा सरकारचा निर्णय स्वागतार्ह आहे.

खरी पैठणी तयार करण्यासाठी कारागिरांना मोठा वेळ, कौशल्य आणि मेहनत घ्यावी लागते. एका पैठणीच्या निर्मितीसाठी अनेक दिवसांचा कालावधी लागतो. त्यामुळे अस्सल पैठणीची किंमतही तिच्या दर्जानुसार असते. परंतु ग्राहकाला खरी आणि बनावट पैठणी यातील फरक सहज ओळखता येत नसल्याने अनेकदा तो अधिक पैसे देऊनही निकृष्ट वस्तू खरेदी करतो. याचा थेट परिणाम ग्राहकांबरोबरच पारंपरिक पैठणी विणकरांवरही होतो.

बारकोड आणि अधिकृत लोगोमुळे ग्राहकाला साडीची अस्सलता तपासणे सुलभ होईल, तसेच बनावट पैठणी विकणाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे प्रशासनालाही शक्य होईल. या योजनेमुळे पैठणीच्या नावाचा गैरवापर रोखण्याबरोबरच महाराष्ट्राच्या पारंपरिक हस्तकलेला विश्वासार्ह बाजारपेठ मिळण्यास मदत होईल.

मात्र, केवळ बारकोड लावून प्रश्न सुटणार नाही. त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होणे, बारकोडची पडताळणी करणारी यंत्रणा सुलभ असणे आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. तसेच पैठणी विणकरांना आधुनिक तंत्रज्ञान, बाजारपेठ, प्रशिक्षण आणि आर्थिक मदत उपलब्ध करून देणेही गरजेचे आहे.

ग्राहकांची फसवणूक रोखणे आणि कारागिरांच्या कष्टाला योग्य मोबदला मिळवून देणे, या दोन्ही उद्देशांनी हा निर्णय महत्त्वाचा ठरू शकतो. महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक असलेल्या पैठणीची ओळख, गुणवत्ता आणि परंपरा जपण्यासाठी सरकार, कारागीर, व्यापारी आणि ग्राहक यांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची गरज आहे. बारकोडमुळे पैठणीची केवळ ओळख पटू नये, तर तिच्या अस्सलतेवर ग्राहकांचा विश्वासही अधिक दृढ व्हावा, हीच अपेक्षा!

**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे

# मतदारांनी ३० सप्टेंबरपूर्वी दावे व हरकती नोंदवाव्यात -जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

## नांदेड जिल्ह्यात विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

**नांदेड (प्रतिनिधी)** –भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशा–नुसार संपूर्ण महाराष्ट्रासह नांदेड जिल्ह्यात १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकाच्या अनुषंगाने विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

प्रारूप मतदार यादी सर्व तहसील कार्यालये, उपविभागीय अधिकारी कार्यालये तसेच संबंधित मतदान केंद्रांवर नागरिकांच्या पाहणीसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच प्रारूप मतदार यादीसोबत अनुपस्थित, स्थलांतरित, मयत व दुबार मतदार यांची यादी जिल्ह्याच्या अधिकृत https://nanded.nic.in या संकेतस्थळावर' प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**दावे व हरकतींसाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदत**

प्रारूप मतदार यादी प्रसिद्धीची तारीख ३१ ऑगस्ट २०२६ असून, दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ असा आहे. दावे व हरकतींवर सुनावणी घेऊन त्यांचा निपटारा २९ ऑक्टोबर २०२६ पर्यंत करण्यात येणार आहे. त्यानंतर अंतिम मतदार यादी ४ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

**मतदारांनी यादीतील नाव तपासावे**

जिल्ह्यातील सर्व मतदारांनी प्रारूप मतदार यादीत आपले नाव, पत्ता व इतर तपशील अचूक असल्याची खात्री करावी. मतदारांना आपले नाव भारत निवडणूक आयोगाच्या मतदार सेवा पोर्टलवर किंवा मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्या https://voters.eci.gov.in किंवा https://ceo.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन तपासता येईल. तसेच संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ), तहसील कार्यालय किंवा मतदार नोंदणी अधिकारी यांच्या कार्यालयातही मतदार यादीची पाहणी करता येईल.

**नवमतदारांसाठी विशेष संधी**

ज्या नागरिकांचे वय १ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी १८ वर्षे पूर्ण होत आहे, ते नवमतदार म्हणून नोंदणीस पात्र आहेत. पात्र नागरिकांनी नमुना ६ चा अर्ज घोषणापत्रासह व आवश्यक कागदपत्रांसह सादर करावा.

मतदारांसाठी विविध नमुना अर्जांची तरतूद करण्यात आली आहे. नमुना ६ नवीन मतदार नोंदणीसाठी, नमुना ६ ए परदेशस्थित भारतीय मतदारांच्या नोंदणीसाठी, नमुना ७ मतदार यादीतील नावाला हरकत घेण्यासाठी किंवा नाव वगळण्यासाठी, तर नमुना ८ नाव, वय, पत्ता आदी तपशीलात दुरुस्ती, अपंगत्वाचे चिन्हांकन किंवा मतदाराचे नाव स्थलांतरित करण्यासाठी वापरता येईल.

**नोटीस प्राप्त मतदारांनी आवश्यक कागदपत्रांसह सुनावणीस उपस्थित राहावे**

मतदार यादीतील नाव, वय, इतर तपशीलातील विसंगती किंवा अनमॅपिंगच्या अनुषंगाने मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडून नोटीस प्राप्त झालेल्या मतदारांनी सुनावणीस उपस्थित राहताना जन्मतारीख व जन्मस्थळ सिद्ध करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे सोबत ठेवावीत.

१ जुलै १९८७ पूर्वी भारतात जन्मलेल्या व्यक्तींनी स्वतःची जन्मतारीख किंवा जन्मस्थळ सिद्ध करणारे आवश्यक कागदपत्र सादर करावे. १ जुलै १९८७ ते २ डिसेंबर २००४ दरम्यान भारतात जन्मलेल्या व्यक्तींनी स्वतःसोबत वडील किंवा आई यांची जन्मतारीख आणि जन्मस्थळ सिद्ध करणारी आवश्यक कागदपत्रे सादर करावीत. २ डिसेंबर २००४ नंतर भारतात जन्मलेल्या व्यक्तींनी स्वतःसोबत वडील व आई यांची आवश्यक कागदपत्रे सादर करावीत.

पालकांपैकी कोणीही भारतीय नागरिक नसल्यास मतदाराच्या जन्माच्या वेळी संबंधित व्यक्तीचा वैध पासपोर्ट व व्हिसाची प्रत सादर करणे आवश्यक आहे. भारताबाहेर जन्म झाल्यास विदेशस्थित भारतीय दूतावास किंवा मिशनने जारी केलेल्या जन्म नोंदणीच्या पुराव्याची प्रत, तर नोंदणीकरण अथवा नागरिकीकरणाद्वारे भारतीय नागरिकत्व प्राप्त केले असल्यास नागरिकत्व नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सादर करावी, असे कळविण्यात आले आहे.

# हदगावात शेतकरी मेळावा व कृतज्ञता सोहळ्यास प्रतिसाद

## कवयित्री कुंदन पाटील यांच्या वास्तववादी कवितेने शेतकरी भारावले



**नांदेड (प्रतिनिधी)**– सहकार महर्षी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या जयंतीनिमित्त आणि राज्य सरकारने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हदगाव येथील सुमन मंगल कार्यालयात युवा नेते भागवत देवसरकर यांनी आयोजित केलेला शेतकरी मेळावा व कृतज्ञता सोहळा यशस्वी झाला. तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. क्षिप्रा मानकर यांनी केले, तर महिला प्रदेशाध्यक्षा लक्ष्मी पाटील यांनी आपल्या मनोगतातून शेतकरी महिलांच्या प्रश्नांना वाचा फोडली. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात आयोजक भागवत देवसरकर यांनी या मेळाव्याच्या आयोजनामागील भूमिका विशद केली.

या मेळाव्याचे प्रमुख आकर्षण ठरल्या प्रसिद्ध कवयित्री कुंदन पाटील. त्यांनी शेतकऱ्यांच्या जगण्यातील वास्तव, दुष्काळ, अतिवृष्टी, बळीराजाचे कष्ट यावर अत्यंत वास्तववादी कविता सादर केल्या. शेतकऱ्यांच्या नशिबी का नेहमीच रडणं... या त्यांच्या कवितेने उपस्थित हजारो शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आणले.

यावेळी कृषी विद्यापीठाचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. भेदे यांनी हळद, ऊस आणि सोयाबीन पिकांवरील किडी व रोगांचे व्यवस्थापन कसे करावे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास आमदार अमरनाथ राजूरकर, आमदार किसनराव वानखेडे, महापौर कविताताई मुळे, कृषी परिषदेचे प्रदेशाध्यक्ष गुणवंत आठरे, महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा लक्ष्मी पाटील, भाजप नेते शेखर पाटील कोळीकर, ॲड. रावसाहेब देशमुख, तुकाराम चव्हाण, मंडलाध्यक्ष गजानन चायल, सूर्यकांत हानवते, प्रकाश राठोड, दत्ता जाधव, ज्ञानोबा गायकवाड, वैभव खुडे, नगरसेवक संदीप भुरे, सचिन सूर्यवंशी, साई बाभुळकर, काळे, डॉ. संदीप कारंजकर, ओम इदेवार, देवानंद वानखेडे, परमेश्वर काळे, देवानंद कदम, योगेश डाखोरे, विशाल पेंटेवार यांच्यासह असंख्य पदाधिकारी उपस्थित होते.

# सिद्धार्थ नगर नागरिकांच्यावतीने आ. चिखलीकर यांचा सत्कार



**लोहा (प्रतिनिधी)**– लोहा, कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार, महाराष्ट्र उपविधान समितीचे अध्यक्ष आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांची जिल्हा बँकेवर संचालकपदी निवड झाल्याबद्दल सिद्धार्थ नगर मित्र मंडळ व नागरिकांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

सिद्धार्थ नगर मित्र मंडळाचे अध्यक्ष तथा आमदार चिखलीकर यांचे विश्वासू कार्यकर्ते अशोक सोनकांबळे यांच्या माध्यमातून, सिद्धार्थ नगरमधील विविध समस्यांचे संदर्भाने शिष्टमंडळाने निवेदन देऊन विस्तृत चर्चा केली. सिद्धार्थ नगरमधील महिला मंडळ व नागरिकांनी आपल्या अडीअडचणी आ. चिखलीकर यांच्यासमोर मांडल्या. आमदार चिखलीकर यांनी सर्व नागरिकांच्या व महिलांच्या समस्या ऐकून घेऊन संबंधित समस्या सोडवण्यास संदर्भाने आश्वासन दिले. तसेच सिद्धार्थ नगरमधील पाण्याच्या प्रश्नासंदर्भात तातडीने एक बोअर पाडून देण्यासाठी आदेश देऊन सिद्धार्थ नगरमधील नागरिकांच्या पाण्याचा प्रश्न कायमचा मिटवला व येणाऱ्या पाच वर्षांमध्ये नगर परिषदेच्या माध्यमातून सिद्धार्थ नगरचा कायापालट केला जाईल असे आश्वासित केले.

अनेक वर्षापासून पावसाळ्यामध्ये त्रासदायक ठरणाऱ्या सिद्धार्थ नगरमधून वाहणाऱ्या नाल्याचाही प्रश्न कायमचा मिटवला असून, लवकरच नाल्याच्या बांधकामा संदर्भात ठोस पावले उचलली जातील असे आ. चिखलीकरांनी बोलताना शिष्टमंडळास सांगितले. सिद्धार्थ नगरमधील नाल्याचा प्रश्न तसेच पाण्याचा प्रश्न व नागरिकांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी दाखवलेल्या तत्परतेबद्दल आमदार चिखलीकर यांचे नागरिकांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नगरसेवक अविनाश पाटील पवार, सिद्धार्थ नगर मित्र मंडळाचे अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यकर्ते अशोक सोनकांबळे, युवा नेते बबनदादा कांबळे, विनोद कापुरे, तावनाजी कोकरे, राम पोहनवार, रवी वाघमारे, बंडा कापुरे, जमील कुरेशी, त्रंबक मामा कदम, गोविंद कानडे, अशोक लोंढे,संजय जाधव,सुनील हटकर,अनिल पाटील कदम,श्याम दाढेल,ज्ञानू भिसे, गोविंद देवके, गफार कुरेशी, हबीब शेख,राजू ठेवरे, राजू नामोळे,आनंद कानोडे, ईश्वर जोरुळे, राजू कंधारे, शब्बीर शेख यांच्यासह नगरांमधील महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

# डॉ. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात; विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**शंकरनगर (प्रतिनिधी)**– मौजे हिप्परगा माळ येथे लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती सामाजिक एकता, बंधुभाव आणि शैक्षणिक उपक्रमांचा संदेश देत उत्साहात साजरी करण्यात आली.

जयंती सोहळ्याचे औचित्य साधून नांदेड–वाघाळा शहर महानगरपालिकेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत नगरसेविका म्हणून निवडून आलेल्या हिप्परगा माळ गावच्या सुनबाई डॉ. मंजुषाताई प्रसाद रानवळकर यांचा सरपंच तिरूपती डाकोरे व ग्रामस्थांच्या वतीने नागरिक सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. मंजुषाताई प्रसाद रानवळकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी गावातील विविध समाजघटकांतील नागरिक, युवक, माता–भगिनी, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. नांदेड महानगरपालिका निवडणुकीत मिळविलेल्या विजयाबद्दल हिप्परगा माळ ग्रामस्थांच्या वतीने डॉ. मंजुषाताई प्रसाद रानवळकर यांचा शाल, पुष्पहार व सन्मानचिन्ह देऊन नागरिक सत्कार करण्यात आला.



गावच्या सुनबाईने महानगरपालिका निवडणुकीत मिळविलेल्या यशाबद्दल ग्रामस्थांनी आनंद व्यक्त करत त्यांचे अभिनंदन केले. गावाशी असलेले नाते जपत सामाजिक कार्यात योगदान देणाऱ्या आणि जनतेच्या प्रश्नांसाठी कार्यरत राहणाऱ्या डॉ. मंजुषाताईंच्या यशाचे ग्रामस्थांनी कौतुक केले.

अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचा सामाजिक संदेश पुढे नेत कार्यक्रमाच्या निमित्ताने जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना पुस्तके व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, त्यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि शैक्षणिक प्रगतीला चालना मिळावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. साहित्य व पुस्तके मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.

## सेवानिवृत्त पोउपनि श्रीपतराव निवळे पाटील यांना 'सर्वोत्कृष्ट अपराध सिद्धी' पुरस्कार

**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्रातील गुन्हे अन्वेषण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे नांदेड येथील सेवानिवृत्त पोलीस



उपनिरीक्षक श्रीपतराव निवळे पाटील यांना त्यांच्या उत्कृष्ट तपासकार्याबद्दल 'सर्वोत्कृष्ट अपराध सिद्धी पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले.

गुन्हे अन्वेषण विभाग पुणे येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात राज्यभरातील विविध जिल्ह्यांतील १३ महत्त्वपूर्ण गुन्ह्यांची निवड करण्यात आली होती. यामध्ये नांदेड जिल्ह्यातील एका गंभीर गुन्ह्याचा सखोल, बारकाईने आणि प्रभावी तपास करून न्यायालयात यशस्वीपणे सिद्ध करण्यात त्यांनी बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# मल्हार योद्धे दीपक बोराडे यांची काकडे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– धनगर एसटी आरक्षण अंमलबजावणी संदर्भात पुढील दिशा ठरवण्यासाठी नांदेड येथे आलेल्या मल्हार योद्धे दीपक बोराडे व युवा नेते पवन करवर यांनी माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाप्रसाद काकडे यांच्या कौठा नांदेड येथील निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी मनपाच्या नगरसेविका सुलोचना धोडींबाराव काकडे त्यांनी त्यांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या. यावेळी समाजबांधवांशी आरक्षण अंमलबजावणी बाबत चर्चा करण्यात आली.

३० ऑगस्ट रोजी जुना कौठा नांदेड येथील माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाप्रसाद काकडे यांच्या निवासस्थानी दीपक बोराडे व धनगर समाजाचे युवा नेते पवन करवर यांनी सदिच्छा भेट देऊन धनगर एसटी आरक्षण अंमलबजावणी बाबत नांदेड येथे ३० ऑगस्ट रोजी विजय नगर मंगल कार्यालय येथे आयोजित राज्यस्तरीय बैठकीला उपस्थिती दर्शवून सविस्तर चर्चा केली.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका निवडणुकीत भाजपा नगरसेविका सुलोचना धोंडिबाराव काकडे हे विजयी झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी भागवत बारसे, विठ्ठल काकडे, संभाजी घोगरे, काकडे वैजनाथ, अतुल बनसोडे, बाळू परळे, विठ्ठल काळे, गणेश काकडे, विनोद काकडे, मारूती काकडे, वैभव काकडे यांच्यासह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## व्हॉईस ऑफ मीडियाच्या नांदेड जिल्हाध्यक्षपदी तुकाराम सावंत



**नांदेड (प्रतिनिधी)**– 'व्हॉईस ऑफ मीडिया' इंटरनॅशनल फोरम महाराष्ट्राच्या वतीने नांदेड येथील आनंद सागर मंगल कार्यालय, सांगवी नांदेड येथे मराठवाडास्तरीय एकदिवसीय 'कॅडर कॅम्प' उत्साहात संपन्न झाला. या महत्त्वपूर्ण कार्यक्रमात पत्रकारितेतील उल्लेखनीय कार्य आणि संघटनात्मक योगदानाची दखल घेऊन तुकाराम सावंत यांची नांदेड जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली.

रविबार, दि. ३० ऑगस्ट २०२६ रोजी पार पडलेल्या या शिबिराचे उद्घाटन 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे संस्थापक तथा आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून लोहा–कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर उपस्थित होते, तर राष्ट्रीय अध्यक्ष अनिल म्हस्के यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले.

# किसान सेवाभावी संस्थेने केला अंध विद्यार्थ्यांसोबत रक्षाबंधन साजरा



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– निवासी अंध कल्याण प्रशिक्षण व पुनर्वसन केंद्र, स्वामी समर्थ नगर, धनेगाव, ता. जि. नांदेड येथे किसान बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने रक्षाबंधनाचा सण उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी अंध विद्यार्थ्यांना राखी बांधून त्यांच्या सोबत मनमोकळ्या गप्पा मारण्यात आल्या. तसेच विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्यात आला. समाजातील दिव्यांग, निराधार व वंचित घटकांसोबत सण साजरे करून अंध विद्यार्थ्यांना मायेची उब दिली. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला.

# तामसा पोलीस ठाणे हद्दीत खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी व मारहाण; तीन स्वतंत्र गुन्हे दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)**– हदगाव तालुक्यातील तामसा पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकाच दिवशी खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी आणि गंभीर मारहाण अशा तीन स्वतंत्र घटना घडल्या असून पोलिसांनी तीनही प्रकरणी गुन्हे दाखल केले आहेत.

हदगाव तालुक्यातील रावणगाव येथे दि. २८ ऑगस्ट रोजी रात्री ८.३० वाजता रस्त्यातील विटा व रेतीच्या कारणावरून आरोपी मंगेश शंकर पावडे, शिवाजी शंकर पावडे, नितेश संभाजी पावडे, ओमकार प्रकाश पावडे, देविदास खंडूजी पावडे, नागोराव खंडूजी पावडे, वेदांत नागोराव पावडे आणि नारायण तानाजी पावडे (सर्व रा. रावणगाव) यांनी बेकायदेशीर जमाव जमवून फिर्यादी अर्जुन ईराजी पावडे (वय ३०) व त्यांच्या भावाला शिवीगाळ करून मारहाण केली. तसेच फिर्यादीच्या वडिलांच्या डोक्यात लोखंडी रॉडने मारून गंभीर जखमी करून जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी BNS कलम १०९(१), ११५(२), ३३३, २९६, ३५१(२)(३), १८९, १९०, १९१ अन्वये गुन्हा दाखल असून, तपास सपोनि सहदेव खेडकर करीत आहेत.

दि. २८ ऑगस्ट रोजी दुपारी १२.३० वाजता विठाई पाणी फिल्टर दुकान, उमरी (ज) येथे आरोपी राजू मुनेश्वर, शिल्पा राजू मुनेश्वर, नागेश मुनेश्वर, रत्नाकर मुनेश्वर, ललित रत्नाकर मुनेश्वर (सर्व रा. बोरगाव, हिमायतनगर), मारोती गायकवाड, साईनाथ मारोती गायकवाड आणि कमलाबाई गायकवाड (रा. हदगाव) यांनी दुकानात घुसून खंजरचा धाक दाखवत काउंटरमधील १ लाख ७ हजार रुपये जबरीने चोरून नेले. फिर्यादी विठोबा किशनराव गुद्धटवाड (४२, रा. पाथरड) यांच्या तक्रारीवरून BNS कलम ३१०(२) अन्वये गुन्हा दाखल असून तपास पोउपनि शेख करीत आहेत.

उमरी (ज) येथे दि. २८ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता फिर्यादी राजू सटवा पडघणे (वय ५८, रा. रूई) हे बहिणीच्या नावावरील घर स्वतःच्या नावावर करून घेण्यासाठी गेले असता आरोपी साई मारोती गायकवाड, कमलाबाई मारोती गायकवाड (रा. हदगाव) आणि शिल्पा राजेश्वर मुनेश्वर (रा. उमरी) यांनी संगनमत करून बॉण्ड करून देऊ नको असे म्हणत शिवीगाळ व हातावर मारहाण करून गंभीर दुखापत केली. भांडण सोडवण्यासाठी आलेल्या फिर्यादीचा मुलगा साईप्रसाद यालाही मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी इछड कलम ११७(२), ११५(२), ३५२, ३५१(२)(३), ३(५) अन्वये गुन्हा दाखल असून तपास पोलीस हवालदार गायकवाड करीत आहेत.

# लिटिल स्टार पब्लिक स्कूलच्या चिमुकल्यांनी वृक्षांना राख्या बांधून केला सण साजरा



**नांदेड (प्रतिनिधी)**– लिटिल स्टार पब्लिक स्कूल प्रि–प्रायमरी, गणेशनगर रोड नांदेड येथे चिमुकल्यांनी झाडांना राखी बांधून निसर्गाचा समतोल राखण्यासाठी वृक्षसंवर्धन किती महत्त्वाचे आहे, याचा नागरिकांना संदेश दिला.

दरवर्षी वृक्षारोपण करून शाळेतील चिमुकल्यांच्या हाताने वृक्षांना राखी बांधून हा बहीण–भावाचा सण उत्साहात साजरा केला जातो. त्यासाठी नेहमीच शाळेच्या प्राचार्या सौ. सुनंदा एडके ह्या अशा उपक्रमांमधून मुलांना चांगले संस्कार देत असतात. तसेच शाळेच्या शिक्षिका स्वाती कदम, स्वाती डोणेराव, संचिता मिस, सुप्रिया मिस, पल्लवी मिस आणि आम्रपालीबाई यांनी रक्षाबंधन सण साजरा करण्यासाठी परिश्रम घेतले.

# अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती महोत्सव; नगरसेवक संजय पाटील घोगरे यांच्या हस्ते ध्वजारोहण

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती महोत्सव सिडको येथे दोन दिवसीय विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, पहिल्या दिवशी भाजपाचे नगरसेवक संजय पाटील घोगरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले तर सायंकाळी प्रबोधनसभा आयोजित करण्यात आली होती.

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे २९ व ३० ऑगस्ट रोजी सार्वजनिक जयंती महोत्सव सिडकोच्या वतीने अण्णाभाऊ साठे स्मारक सिडको येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी सकाळी १० वाजता नगरसेवक संजय पाटील घोगरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करण्यात आले.



यावेळी वैजनाथ देशमुख, नगरसेवक प्रतिनिधी उदय देशमुख, राजू लांडगे, सतीश बसवदे, दलित मित्र आर. जे. वाघमारे, माधव अंबटवार, नारायण कोलंबीकर, जनार्दन गुपीले, विठ्ठल घाटे, मरीबा बसवंते, शंकर धिरडीकर, डी. के.कांबळे, आनंदा गायकवाड, उत्तम घोडेकर, सुरेश कांबळे, दत्तराम दर्शने, रवी पंडित यांच्यासह समाजातील ज्येष्ठ बांधव, युवक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी शाहीरी जलसा व्यंकटराव सोनटक्के अण्णाभाऊ साठे गायक संच वसमत यांचा आयोजित करण्यात आला होता तर प्रमुख वक्ते ड.महादेवजी कांबळे व राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिवा कांबळे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सूत्रसंचलन दिगांबर शिंदे यांनी केले. सोहळा यशस्वीतेसाठी अध्यक्ष अंकुश गायकवाड, स्वागताध्यक्ष रमेश तालीमकर, कार्याध्यक्ष रंगनाथ गजले, पप्पू गायकवाड, नितीन वाघमारे, साईनाथ भोसले, चंदम कांबळे, दशरथ कंधारे, माधव गवाले, साहेबराव डाकोरे, संभाजी कांबळे व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती
# शिवार

**गुलाबाच्या फुलांचा उपयोग गुलाबपाणी, अत्तर तयार करण्यासाठी होतो. गुलाबाच्या पाकळ्यांपासून गुलकंद तयार करतात. अलीकडे गुलाब फुलांचा उपयोग सजावट, गुच्छ, हारतुरे करण्यासाठी वाढला आहे. परदेशात गुलाब फुलांचा उपयोग लांब दांड्याचे फूल (कटफ्लावर) म्हणून करतात. जगभरात होणाऱ्या फुलांच्या उलाढालीत एकट्या गुलाबाचा वाटा ३५ ते ४० टक्के आहे.**



# खुल्या शेतीतील गुलाब लागवड तंत्रज्ञान

## हवामान कसे हवे?

» तापमान : पिकाच्या वाढीसाठी आणि बहरासाठी १५ ते ३० अंश सेल्सिअस तापमान आवश्यक असते. असे तापमान नाशिक, पुणे, सांगली, कोल्हापूर आणि बेळगाव येथे असल्याने या भागात वर्षभर गुलाबास फुले येतात. बहरासाठी हिवाळी हंगाम उत्तम असतो. नोव्हेंबर ते फेब्रुवारी या कालावधीत उत्तम प्रतीची भरपूर फुले मिळतात. उत्तम प्रतीच्या फुलासाठी रात्रीचे तापमान १४ ते १६ अंश सेल्सिअस असावे लागते. हे तापमान कमी-जास्त झाले तर त्याचा थेट परिणाम फुलांच्या रंगावर, गुणवत्तेवर व उत्पादनावर होतो. उन्हाळ्यात उष्ण व कोरड्या हवेमुळे गुलाबाची वाढ खुंटते, बहर कमी येतो, त्याची गुणवत्ताही चांगली नसते. पावसाळ्यातील अति पावसामुळे वाढीवर विपरीत परिणाम होतो. पावसाळ्यातील ढगाळ हवामान आणि जास्त आर्द्रता यांचा परिणाम फुलांच्या गुणवत्तेवर होतो.

» प्रकाश : फुलाच्या चांगल्या वाढीसाठी स्वच्छ व भरपूर सूर्यप्रकाशाची आवश्यकता असते. कमी प्रकाशात अथवा सावलीत गुलाब झाडाची वाढ नीट होत नाही, फुलेही कमी लागतात.

» आर्द्रता : पावसाळी हवामानातील ढगाळ वातावरण आणि जास्त आर्द्रता झाडाच्या वाढीस हानीकारक ठरते. आर्द्रता जास्त झाल्यास रोग, किडींचा प्रादुर्भाव वाढतो. हवेतील सरासरी ६० ते ६५ टक्के आर्द्रता पीक वाढीसाठी चांगली असते. यापेक्षा कमी अथवा जास्त आर्द्रता गुलाबास हानिकारक ठरते.

» कर्ब वायू : वातावरणात ०.०३ टक्के कर्बवायूचे प्रमाण असते; परंतु हे कर्बवायूचे प्रमाण ०.०८ - ०.१ टक्क्यापर्यंत वाढल्यास गुलाबाची वाढ चांगली होते. त्याचबरोबर उच्च गुणवत्ता असलेल्या फुलांचे उत्पादनही मिळते. प्लॅस्टिकच्या बंदिस्त अथवा अर्धबंदिस्त हरितगृहात कर्बवायू नियंत्रित करता येतो. उघड्यावरील शेतीमध्ये कर्बवायूचे आपण योग्य प्रमाण ठेऊ शकत नाही. परंतु उघड्यावरील शेतात प्लॅस्टिकची अर्धबंदिस्त हरितगृहे उभारून या घटकावर काही प्रमाणात नियंत्रण करून गुणवत्तापूर्ण फुलांचे उत्पादन घेणे शक्य आहे.

## अशी हवी जमीन...

झुडूपवर्गीय बहुवर्षायू पीक असल्याने एकदा लागवड केल्यानंतर त्याच जमिनीत ते पाच-सहा वर्षे राहते. त्यामुळे खुल्या शेतीतील (ओपन) गुलाब लागवडीसाठी योग्य जमिनीची निवड करावी. या पिकाची वाढ सातत्याने होत असते. त्यांची मुळे जमिनीत खोलवर जाण्यापेक्षा आडवी जास्त पसरतात. त्यामुळे गुलाब लागवडीसाठी ४० ते ४५ सें.मी. खोलीची जमीन निवडावी. निवडलेली जमीन ही सकस आणि पाण्याचा योग्य निचरा होणारी असावी. अतिशय हलकी किंवा भारी जमिनी अयोग्य असतात. भारी, चोपण, पाणथळ, खडकाळ जमिनीतही हे पीक चांगले येत नाही. लागवडीस मध्यम, पाण्याचा चांगला निचरा होणारी आणि सामू ६ ते ७.५ च्या दरम्यान असणारी जमीन निवडावी. परदेशात दर्जेदार उत्पादनासाठी रॉकवूल या सच्छिद्र माध्यमामध्ये गुलाबाची लागवड करतात.

## छाटणी

कलमांना नवीन येणाऱ्या धुमाऱ्यांना किंवा फांद्यांना फुले येतात. या अंगभूत गुणामुळे छाटणी करणे गरजेचे असते. गुलाबाच्या जुन्या फांदीवर फुले येत नाहीत. त्यामुळे गुलाबाला नव्या फांद्या येऊन फुले लागावीत म्हणून गुलाबाची छाटणी करणे आवश्यक असते. छाटणीपासून ४० ते ४५ दिवसांनी गुलाबाची फुले काढणीस तयार होतात. त्यामुळे बाजारभाव लक्षात घेऊन फुलांचे नियमन छाटणीने करता येते. वर्षातून दोनदा छाटणी करून फुलांचा बहर धरता येतो. एक छाटणी पावसाळा संपताना सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये, तर दुसरी हिवाळा संपताना जानेवारी-फेब्रुवारी महिन्यात करता येते. गुलाबाचे मोठे क्षेत्र असल्यास बाजाराचे नियमन करण्याच्या दृष्टीने एकदम एकाच वेळी सर्व क्षेत्राची छाटणी न करता टप्प्याटप्प्याने करावी. छाटणी करताना झाडाच्या मुख्य फांद्या तशाच ठेवून त्यांच्या उपफांद्यांची छाटणी करावी. छाटणी धारदार कात्रीने करावी. छाटणीअगोदर १० ते १५ दिवस बागेस पाण्याचा ताण द्यावा. छाटणी करताना जोमदार, निरोगी व सजीव फांद्या ठेवून बाकीच्या कमजोर, रोगट, वाळलेल्या फांद्या कापाव्यात. छाटणी करताना कात्री बुरशीनाशकाच्या द्रावणात बुडवून घ्यावी म्हणजे बुरशीचा प्रादुर्भाव होत नाही. छाटलेल्या भागावर बोर्डोपेस्ट ताबडतोब लावावी. ही काळजी घेतल्यास रोगाचा प्रसार थांबतो. छाटलेल्या फांद्या जाळून नष्ट कराव्यात. अनावश्यक फांद्यांची गर्दी झाल्यास झाडाचा आकार बिघडतो. उत्पादनावर विपरीत परिणाम होतो म्हणून कलमांची प्रमाणशीर छाटणी करावी. छाटणी करताना झाडाच्या मध्यापर्यंत सूर्यप्रकाश पोचेल अशी छाटणी करावी.

## छाटणीचे प्रकार

» सौम्य छाटणी : या छाटणीच्या प्रकारात फांदीच्या शेंड्याकडील टोके अथवा काही भाग थोड्या प्रमाणावर छाटला जातो. या छाटणीमुळे भरपूर फुले लागतात; परंतु त्यांचा आकार लहान राहतो. विशेषतः मिनिएचर्स गुलाबामध्ये अशी छाटणी करतात.

» मध्यम छाटणी : या छाटणीमध्ये उपफांद्या मध्यम उंचीवर म्हणजे ७ ते ८ डोळे ठेवून उरलेला सर्व भाग कापला जातो. इतर दोन्ही छाटणीपेक्षा ही छाटणी चांगली असते. कारण, या छाटणीमुळे झाडांची उंची मध्यम राहून ती डौलदार वाढतात. फुलांना लांब दांडे मिळतात, दर्जेदार उत्पादन मिळते.

» कडक छाटणी : या छाटणीला भारी छाटणी म्हणतात. या छाटणीत झाडाच्या मूळ बुंध्यापासून १५ ते २० सें.मी. अंतर ठेवून बाकीचा सर्व भाग कापतात. ही छाटणी झाडाचे नूतनीकरण करण्यास उपयुक्त ठरते. छाटणीनंतर फुलांचे उत्पादन कमी येते; परंतु फुलांचा दर्जा सुधारतो.

» काढणी : जवळच्या बाजारपेठेसाठी फुले किंचित उमलू लागल्यावर म्हणजे एक-दोन पाकळ्या उमलत असताना काढणी करावी. बाजारपेठ लांबची असेल तर कळी घट्ट असलेल्या अवस्थेत मात्र ती कळी नंतर उमलू शकेल अशा अवस्थेत काढावी. फुलांची काढणी सूर्योदयापूर्वी धारदार कात्रीने करावी. फुलांची काढणी करताना जास्तीत जास्त लांब दांडा मिळेल अशा प्रकारे करावी. काढणी केलेले दांडे पाण्यात राहतील इतके पाणी बादलीत असावे. काढणी झाल्यावर काढलेल्या दांड्यांना खालून पुन्हा दोन सें.मी. अंतरावर कट घ्यावा. फुले लगेच बाजारपेठेत पाठवावयाची नसतील तर ती ४ ते ६ अंश सेल्सिअस तापमानाला ६ ते १२ तास शीतगृहात साठवावीत.

» प्रतवारी : फुलांची प्रतवारी करताना रंग, आकार, जात, उमलण्याची अवस्था आणि दांड्याच्या लांबीनुसार करावी. प्रतवारी केलेल्या फुलदांड्याच्या १ ते २ डझनाच्या जुड्या बांधाव्यात. अशा जुड्या वृत्तपत्राच्या कागदात गुंडाळून दूरच्या बाजारपेठेत पाठवण्यासाठी पुन्हा सहा तास २ अंश सेल्सिअस तापमानाला साठवाव्यात. नंतर कागदी पुठ्ठ्याच्या खोक्यात व्यवस्थित फुलदांड्याची मांडणी करून खोकी बंद करून लेबल लावून बाजारात पाठवावेत. परदेशी बाजारपेठेसाठी फुलदांड्याची लांबीनुसार प्रतवारी करावी. ५०-५५ सें.मी., ५५-६० सें.मी. आणि ६०-६५ सें.मी. लांबीच्या फुलदांड्याचे वेगवेगळे गट करून २० फुलदांड्याची एक गड्डी तयार करून योग्य पॅकिंगसहित शीतगृहात साठवून शीतवाहनामार्फत फुलदांडे परदेशी बाजारपेठेत पाठवले जातात.

**प्रत्येक झाडापासून पहिल्या वर्षी सरासरी २० ते २५ फुले, दुसऱ्या वर्षी ३० ते ३५ फुले, तर तिसऱ्या वर्षापासून ५० ते ६५ फुलांचे उत्पादन मिळते.**

## पीक संरक्षण...

» भुरी : भुरी रोगामुळे पानांवर बुरशीचा पांढरा थर निर्माण होतो. तो पुढे कळ्या व फुलांवर पसरतो. दिवसा जास्त तापमान व रात्री खूप थंडी तसेच धुके यामुळे रोगाचा प्रसार होतो. नोव्हेंबर-फेब्रुवारीमध्ये या रोगाचा जास्त प्रादुर्भाव दिसून येतो.

» करपा : रोगाचा पावसाळ्यात प्रादुर्भाव होतो. गुलाबाच्या पानावर प्रथमतः छोटे-छोटे काळे ठिपके पडतात. पुढे ते वाढत जाऊन पाने पिवळी पडून गळून जातात.

» नियंत्रण : प्रतिबंधक उपाय म्हणून बाग स्वच्छ ठेवावी. प्रादुर्भावाची लक्षणे तपासून शिफारशीत बुरशीनाशकाची फवारणी करावी.

» किडींचा प्रादुर्भाव : प्रामुख्याने लाल कोळी, पांढरी माशी, मावा, फुलकिडे, पाने खाणारी अळी, कळी पोखरणारी अळी या किडींचा प्रादुर्भाव होतो.

» नियंत्रण : एकात्मिक कीड नियंत्रण पद्धत अवलंबावी. एकाच कीटकनाशकाचा वारंवार उपयोग टाळावा. शिफारशीनुसार आंतप्रवाही आणि स्पर्शजन्य कीडनाशके गरजेनुसार आलटून पालटून वापरावीत.

## रंगानुसार जातीचे वर्गीकरण

» लाल : ग्लॅडिएटर, ख्रिश्चन डायर, रक्तगंधा, रेड मास्टर पीस, ओन्ली लव्ह, इत्यादी.

» गुलाबी : फ्रेंडशिप, फर्स्ट प्राईज, मारिया क्लास इत्यादी

» पिवळा : लॅंडोरा, समर सनशाईन, गोल्डन टाइम्स, माबेल्ला इत्यादी

» निळा/जांभळा : लेडी एक्स, ब्लू मून, पॅराडाईज इत्यादी

» केशरी : समर हॉलिडे, सुपरस्टार, प्रिन्सेस इत्यादी

» पांढरा : ऑनर, व्हिर्गो, जॉन एफ. केनेडी, मॅटर हार्न इत्यादी

» दुरंगी : लव्ह, हार्टसमन

» बहुरंगी : डबल डिलाईट, पीस, अभिसारिका

## आंतरमशागत

लागवडीनंतर प्रत्येक रोपावर लक्ष द्यावे. मुळखुंटाला जमिनीतून येणारी अथवा कलमांच्या खालील भागावरील काडीवरील फूट वारंवार काढावी. शेत तणमुक्त ठेवावे. पावसाळ्यात शेतात पाणी साठू नये म्हणून चर काढून पाणी काढून टाकावे. सुरवातीच्या काळात कलमावर येणाऱ्या कळ्या काढून टाकाव्यात म्हणजे कलमांची शाकीय वाढ जोमदार होते.

## पाणी नियोजन

कलमांची सुरुवातीच्या काळात काळजी घ्यावी. पाण्याचा ताण पडू देऊ नये. त्यासाठी वेळोवेळी पाणी द्यावे. कलम रुजेपर्यंत थोडे-थोडे वारंवार पाणी द्यावे. नंतर मात्र आवश्यकतेनुसार पाणी द्यावे. गरजेपेक्षा जास्त पाणी झाल्यास गुलाबाला मूळकुजव्या रोग होतो. गुलाबाला ठिबक सिंचन करावे.

## खत व्यवस्थापन

उत्तम वाढीसाठी आणि दर्जेदार उत्पादनासाठी लागवडीनंतर कलमास १५ दिवसांनी १० ग्रॅम युरिया, एक महिन्यानंतर १० ग्रॅम डी.ए.पी. आणि दोन महिन्यानंतर २ ग्रॅम मॅग्नेशियम सल्फेट द्यावे. दुसऱ्या वर्षापासून बागेस हेक्टरी ५० टन शेणखत, १२०० किलो युरिया, २४०० किलो सिंगल सुपर फॉस्फेट आणि ६५० किलो सल्फेट ऑफ पोटॅश द्यावे. जून महिन्यात संपूर्ण स्फुरद, अर्धे शेणखत तसेच १/४ नत्र आणि १/४ पालाश या खताची मात्रा द्यावी. राहिलेली अर्धी शेणखताची मात्रा ऑक्टोबर छाटणीनंतर द्यावी. सोबत १/४ नत्र व अर्धी पालाशची मात्रा द्यावी, तर राहिलेली १/४ नत्र व १/४ पालाश खत डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आणि पुन्हा जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात विभागून द्यावे.

## जमिनीची आखणी

जमिनीची योग्य मशागत करून लव्हाळी, हरळीसारख्या बहुवर्षायू तणांचे नियंत्रण करावे.जमीन उभी-आडवी नांगरून उन्हामध्ये चांगली तापू द्यावी. जमिनीचे सपाटीकरण करावे. त्यामुळे पाणी देणे सोपे होते. तयार केलेल्या जमिनीत चर किंवा खड्डा पद्धतीने लागवड करावी. एकेरी ओळ पद्धतीने लागवड करताना ४५ सें.मी. × ४५ सें.मी. × ४५ सें.मी. आकाराचा खड्डा खणावा. दोन खड्ड्यांतील अंतर ७५ सें. मी. ठेवावे. दोन ओळींतील ७५ ते १०० सें.मी. अंतर ठेवावे. दोन ओळींतील अंतर ठेवताना आंतरमशागत सुलभपणे कशी करता येईल या गोष्टीचा विचार करावा. चर पद्धतीने लागवड करताना ६० सें.मी. रुंद आणि ४५ सें.मी. खोल चर काढावा. दोन चरांतील अंतर १.५ मी. ठेवावे. चरामध्ये लागवड करण्यासाठी दोन झाडांतील अंतर ४५ सें.मी. ठेवावे. चरामध्ये लागवड करताना शक्यतो त्रिकोण पद्धतीचा अवलंब करावा. लागवडीसाठी काढलेले खड्डे व चर लागवडीपूर्वी खत व माती मिश्रणाने भरून घ्यावेत. हेक्टरी १० टन शेणखत किंवा कंपोस्ट खत, एक टन सिंगल सुपर फॉस्फेट आणि शिफारशीत कीडनाशक वापरावे. लागवड वर्षभर केव्हाही करता येत असली तरी पावसाळी हंगामातील लागवड यशस्वी होते.

## कलमांची निवड

लागवडीसाठी स्वतः तयार केलेली कलमे निवडावीत किंवा प्रमाणित रोपवाटिकेतून खात्रीशीर, निरोगी हव्या त्या जातीच्या कलमांची निवड करावी. ज्या कलमांचा जोड चांगला जमला आहे, जोमदार वाढ असणारे निरोगी कलम निवडावे. निवडलेले कलम हे ४ ते ६ महिने वयाचे असावे. लागवड करण्यासाठी खड्ड्यामध्ये अथवा चरावर कलमांच्या प्लॅस्टिकच्या पिशवीच्या आकाराचा खड्डा घ्यावा. कलमे लावताना प्लॅस्टिकची पिशवी कलमांची हुंडी न फोडता अलगद वेगळी करावी. कलम खड्ड्यात लावताना कलमांचा जोड जमिनीपासून १० ते १५ सें.मी. वर राहील याची काळजी घ्यावी. कलम लावताना मूळ खुंटाची फूट काढूनच कलम खड्ड्यात लावावे. कलम लावल्यानंतर लगेच पाणी द्यावे. पाऊस नसेल तर कलमांची वाढ सुरू होईपर्यंत दररोज हलके पाणी द्यावे. कलमाला फुले आली असल्यास ती तोडून काढावीत. कलमांची जोमदार वाढ होईपर्यंत आणि ते दर्जेदार उत्पादन देण्यास योग्य वाढीचे होईपर्यंत येणारी फुले काढून टाकावीत.

## जाती कोणत्या?

» गुलाबाच्या २० हजारांहून जास्त जाती लागवडीखाली असल्या तरी योग्य जात निवडावी. आपल्या हवामानात आणि जमिनीत चांगली वाढणारी, आकर्षक, टपोरी, विविध रंगी व सुवासिक फुले असणारी आणि दर्जेदार फुलांचे उत्पादन देणारी जात निवडावी. बाजारात मुख्यत्वे करून ग्लॅडिएटर, रक्तगंधा, अर्जुन, सुपरस्टार, लेडी एक्स, पापा मिलन, ब्लू मून, डबल डिलाइट, पॅराडाइज, ख्रिश्चन डायर, ओक्लोहोमा, अमेरिका हेरिटेज, लॅंडोस, पीस इत्यादी जातींना मागणी आहे.

» जातींची विभागणी बागेत लावण्यासाठी : जास्त फुले देण्याची क्षमता असलेल्या फ्लोरीबंडा, मिनिएचर व हायब्रीड टी प्रकारातील काही जातींची निवड करावी. बागेत लागवडीसाठी जोमदार वाढणाऱ्या, आकर्षक रंगाची जास्त फुले असलेल्या, जास्त काळापर्यंत फुलणाऱ्या व रोग-किडीस प्रतिकारक्षम जाती निवडाव्यात. उदा. पास्ता, कोरोना, डॅनिश गोल्ड, रॉबिनसन, ऑल गोल्ड, युरोपिआना, इत्यादी.

» फुलदाणी, गुच्छ व सजावटीसाठी : पाकळ्यांची विशिष्ट ठेवण असलेल्या फुलांचा आकर्षक आकार, रंग व सुवास असलेल्या, पाने तजेलदार व दांडा लांब असलेल्या जाती निवडाव्यात. त्याची व्यापारी तत्त्वावर लागवडही करतात. उदा. ग्लॅडिएटर, सोनिया, रक्तगंधा, अर्जुन, डबल डिलाईट, लॅंडोरा, टिकाने, सुपरस्टार, इलोनी, मर्सडिस, पापा मिलन, लेडी एक्स, ब्लू मून इत्यादी.

» प्रदर्शनासाठी : ज्या फुलांचा आकार मोठा, फुलाचा दांडा भक्कम व लांब, दांड्यावर तजेलदार पाने, अनेक पाकळ्यांची उत्तम ठेवण, आकर्षक अशा जातीची प्रदर्शनासाठी निवड करतात.

## फुलांचे प्रकार



» झाडाची वाढ, पाकळ्यांची संख्या, फुलांची संख्या, रंग-सुगंध, दांडाची ठेवण इत्यादी वैशिष्ट्यांवरून गुलाबाचे प्रमुख सहा प्रकार पडतात.

» हायब्रिड टी : लांब दांड्याच्या फुलासाठी लागवडीस योग्य प्रकार आहे. प्रत्येक फांदीवर १ ते ३ लांब दांड्याची फुले येतात. झाड मध्यम ते जोमदार वाढते. फुले मोठी, आकर्षक, एकेरी अथवा दुहेरी रंगाची असतात. काही जाती सुगंधी आहेत. या प्रकारात गॅंडिएटर, सुपरस्टार, डबल डिलाईट, पीस, ॲम्बेसॅडर, ब्लू मून, फस्ट प्राईज, पापा मिलन, समर सनशाईन, लॅंडोरा, डॉ. होमी भाभा, स्नो गर्ल,जॉन एफ. केनडी इत्यादी जातींचा समावेश होतो.

» फ्लोरीबंडा : या प्रकाराची फुले मध्यम आकाराची, टिकाऊ आणि झुपक्यात येतात. त्यामुळे बागेत ताटव्यासाठी हा प्रकार उपयुक्त ठरतो. फुले हायब्रीड टीपेक्षा आकाराने लहान असतात. काही जातींना लांब दांड्याची फुले येतात. या प्रकारात बंजारन, ऑल गोल्ड, चंद्रमा, डिअरेस्ट, दिल्ली प्रिन्सेस, सिटी ऑफ लखनौ, इन्डीपेन्डन्स, समर स्नो, नीलांबरी, प्रेमा, हिमांगिनी, पावडर पफ, डिव्होशन, सी पर्स, शोला या जाती आहेत.

» पॉलिएन्या : मध्यम उंचीच्या झाडाला एकेरी लहान, पसरट पण झुपक्याने फुले लागतात. कुंडीत, परसबागेत, कुंपणासाठी लागवड करण्यास हा प्रकार उपयोगी असतो. उदा. पिंक शॉवर, एको, बेबीरेड, बेबीव्हाईट, प्रीती.

» मिनिएचर्स : यास छोटा गुलाब असे म्हणतात. लहान झाडाची पानेही लहान असतात. याला लहान फुले झुपक्याने येतात. याची झाडे काटक असतात. कमी जागेत किंवा कुंड्यात लागवडीसाठी उपयुक्त. या प्रकारात पिक्सी, बेबी गोल्डस्टार, रोझ मरीन, किंग यलो डोल, स्वीट फेअर, ड्वार्फ किंग इत्यादी जाती आहेत.

» वेली गुलाब : हा गुलाब वेलासारखा जोमाने वाढतो. कुंपण, भिंत, मांडव आणि कमानीवर चढवण्यासाठी याचा उपयोग होतो. वेल गुलाबाच्या कॅसिनो, कॉकटेल, फाउंटन, गोल्डन शॉवर, मेरी गोल्ड, रॉयल गोल्ड, स्नो गर्ल, क्लाइम्बिंग पिस, इत्यादी जाती आहेत.

» सुवासिक गुलाब : या गुलाबाची फुले सुवासिक असतात. फुलांना मनमोहक मंद सुवास येतो. फुलांचा उपयोग गुलाबपाणी, गुलकंद, अत्तर व सुवासिक तेल तयार करण्यासाठी करतात. यासाठी अ‍ॅव्हान, ब्लू मून, कॉन्फिडन्स, क्रिमसन ग्लोरी, एफेल टॉवर, डबल डिलाईट, नूरजहान, मधुरा, परफ्युम डिलाईट, गार्डन पार्टी, ऐंजलफेस या जाती वापरतात. परंतु मुख्यतः दमास्का गुलाब, एडवर्ड गुलाब, सेंटिफोलिया गुलाब आणि मोस्वाटा गुलाब या चार प्रकारातील गुलाब प्रामुख्याने प्रक्रियायुक्त पदार्थ तयार करण्यासाठी वापरतात.

## अभिवृद्धी

अभिवृद्धी बी, फाटे, कलम व लेअरिंग याद्वारे होते. व्यापारी दृष्टिकोनातून ‘T’ पद्धतीने डोळे भरण्याची पद्धत महत्त्वाची आहे. डोळे भरण्यासाठी मात्र मुळखुंट म्हणून पूना ब्रायर, रोझा इंडिका, व्हरायटी ओडोराटा, रोझा मल्टीफ्लोरा (महाबळेश्वरी) यांचा वापर करावा. कलम करण्यासाठी सुधारित पॉली बॅग पद्धतीचा अवलंब करावा. त्यासाठी प्रथमतः मुळखुंटाचे पक्व ३ ते ४ डोळे असलेले, १५ ते २० सें.मी. लांबीचे छाटे मातीमिश्रणाने भरलेल्या पॉलीबॅगमध्ये लावावेत. छाट्यांना लवकर व भरपूर मुळ्या फुटण्यासाठी शिफारस केलेल्या संजिवकाची प्रक्रिया करावी. कलमे करण्यासाठी जोमदार वाढीचे मुळखुट निवडावे. छाट्यांना फुटलेल्या फांदीची जाडी पेन्सिलच्या आकाराची झाली की त्यावर ‘T’ पद्धतीने डोळे भरावेत. डोळे भरण्यासाठी खुंटावर २ ते ३ सें. मी. लांबीचा उभा काप घेऊन त्यावर पुन्हा आडवा काप घ्यावा. साल अलगद खोडापासून वेगळी करावी. या कापामध्ये तेवढ्याच आकाराचा



हव्या त्या जातीचा २ ते ३ सें.मी. लांब ढालीच्या आकाराचा डोळा काढून बरोबर खोड व साल यांच्यामध्ये बसवून प्लॅस्टिकच्या पट्टीच्या साह्याने गुंडाळून घट्ट बांधावे. डोळा बांधताना डोळा उघडा राहील याची खबरदारी घ्यावी. कलम केलेले झाड ताबडतोब सावलीत किंवा नेटहाऊसमध्ये ठेवावे. त्याचे योग्य संगोपन केल्यास ५ ते ६ महिन्यांत कलमे लागवडीस तयार होतात. कलमे करण्याचे काम फेब्रुवारी महिन्यात करावे.

# नेपाळच्या पुरात महाराष्ट्रातील ६० जण अद्यापही बेपत्ता



**नवीदिल्ली**—नेपाळमध्ये महापुराने मोठा विध्वंस केला आहे. तेथील जनजीवन पूर्णत विस्कळीत झालं आहे. या महापुरात शेकडो लोकांचा मृत्यू झाला आहे. तर हजारो लोक बेपत्ता झाल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान, या महाप्रलायाचा फटका फक्त नेपाळलाच नाहीतर जगातील अनेक देशांना बसला आहे. महाराष्ट्रातील नागरिक देखील नेपाळमधील महापुरात अडकले आहेत. दरम्यान, याबाबत महत्वाची माहिती समोर आली असून, महाराष्ट्रातील ६० जण अद्यापही बेपत्ता आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील ४०४ पर्यटकांपैकी ३३८ सुरक्षित आहेत. तर ६० नागरिक अद्याप बेपत्ता असल्याची माहिती मिळत आहे. हे ६० नागरिक मुंबईस्थित एका ट्रॅव्हल कंपनीमार्फत नेपाळला गेले होते आणि प्रशासनाला अद्याप या गटाशी थेट संपर्क साधता आलेला नाही. दरम्यान, २६ ऑगस्ट रोजी आलेल्या अचानक आलेल्या पुरामुळे नेपाळ-तिबेट प्रदेशात अडकलेल्या महाराष्ट्रातील ४०४ लोकांपैकी, अधिकाऱ्यांनी ३३८ जणांशी संपर्क साधून त्यांच्या सुरक्षिततेची खात्री केली आहे. त्यापैकी ३७ जणांना भारतात आणले जात आहे. ही माहिती राज्य सरकारच्या एका अहवालातून समोर आली आहे.

मुंबईतील एका ट्रॅव्हल कंपनीमार्फत नेपाळला गेलेले ६० पर्यटक अद्याप बेपत्ता आहेत. अहवालात असेही म्हटले आहे की, परराष्ट्र मंत्रालयाने चीन/तिबेट प्रदेशात सुरक्षित असलेल्या १४९ भारतीयांची यादी राज्य सरकारला दिली आहे. हे सर्व महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यांचे रहिवासी आहेत. अहवालानुसार, सरकारने ही यादी ओळख पटवण्यासाठी आणि पुढील समन्वयासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवली आहे. अहवालानुसार, नेपाळ-तिबेट प्रदेशात अडकलेल्या महाराष्ट्रातील ४०४ लोकांपैकी ३७ जणांचा एक गट सागा (तिबेटमध्ये) येथून निघाला असून, त्यांना भारतात आणले जात आहे.

एका सरकारी अहवालानुसार, अधिकाऱ्यांनी या ४०४ लोकांपैकी ३३८ लोकांशी संपर्क साधून त्यांच्या सुरक्षित असल्याची खात्री केली आहे. अहवालात म्हटले आहे की, परराष्ट्र मंत्रालयाने सध्या चीन/तिबेट प्रदेशात असलेल्या १४९ भारतीय नागरिकांची यादी महाराष्ट्र सरकारला दिली आहे. हे नागरिक महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यांतील असल्याने, अधिकारी संबंधित जिल्हा प्रशासनांमार्फत त्यांची माहिती गोळा करण्याचे काम करत आहेत.

## छत्रपती शिवरायांच्या विचारांवर नवी दिल्लीत राष्ट्रीय चर्चासत्र

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**– छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनकार्य, प्रशासन व्यवस्था आणि राष्ट्रनिर्मितीच्या विचारांसंदर्भात नवी दिल्लीत दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ (जेएनयू) आणि श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'जयिष्णू : सहिष्णू भारताचे रक्षक' या विषयावर २ व ३ सप्टेंबर २०२६ रोजी जेएनयूच्या कन्व्हेन्शन सेंटरमध्ये हे चर्चासत्र होणार आहे.

शिवाजी महाराजांच्या इतिहासाकडे केवळ युद्ध आणि पराक्रमाच्या दृष्टिकोनातून न पाहता त्यांची प्रशासन व्यवस्था, राज्याभिषेक, दक्षिण दिग्विजय, मराठा आरमार, संस्कृत साहित्यातील शिवरायांचे संदर्भ तसेच पुढील काळातील मराठ्यांचा दिल्लीवरील प्रभाव अशा विविध पैलूंवर चर्चासत्रात तज्ज्ञांकडून विचारमंथन केले जाणार आहे. चर्चासत्राचा उद्घाटन सोहळा २ सप्टेंबर रोजी सकाळी साडेदहा वाजता जेएनयूच्या कुलगुरू प्रा. शांतिश्री पंडित यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

# एसआयआर यादीतून राज्यातील दोन कोटी मतदारांना वगळलं?



**मुंबई(प्रतिनिधी)**—राज्यातील मतदारांसाठी एक अत्यंत महत्त्वाची आणि मोठी बातमी समोर येत आहे. राज्य मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने 'विशेष सखोल पुनरीक्षण २०२६' अंतर्गत राज्याची नवी प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. मात्र, या यादीतून राज्यातील तब्बल २ कोटींपेक्षा जास्त मतदारांची नावे वगळण्यात आल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

सखोल पुनरीक्षणाची ही प्रक्रिया राबवण्यापूर्वी राज्यात एकूण ९,७८,५४,०४९ नोंदणीकृत मतदार होते. परंतु, नव्याने प्रसिद्ध झालेल्या मसुद्यात ७,७१,६५,५६२ (७८.८६%) मतदारांचाच समावेश करण्यात आला आहे. म्हणजेच गणना प्रपत्र न मिळाल्यामुळे, गैरहजर असणे, स्थलांतर, मृत्यू किंवा दुबार नोंदणीमुळे तब्बल २,०६,८८,४८७ (२१.१४%) मतदारांची नावे सध्याच्या यादीत समाविष्ट झालेली नाहीत.

या नव्या प्रारुप यादीत पुरुष मतदारांची संख्या ३,९५,८९,९०५ इतकी आहे, तर महिला मतदारांची संख्या ३,७५,७२,५७० एवढी नोंदवण्यात आली आहे. याशिवाय ३,०८७ तृतीयपंथी मतदारांचा यादीत समावेश आहे. तुमचे नाव मतदार यादीत सुरक्षित आहे की नाही, हे तपासणे आता प्रत्येक नागरिकासाठी महत्त्वाचे ठरणार आहे.

मतदारांनी त्यांचे नाव निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेल्या मसुद्यात आहे की नाही हे तपासण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाच्या वेबसाईटवर भेट द्यावी. उएज चरहरीरीहींर या लिंकवर जाऊन प्रारुप मतदार यादी २०२६ यावर आपले नाव तपासावे.

वगळण्यात आलेल्या किंवा नवीन नाव नोंदवू इच्छिणाऱ्या नागरिकांसाठी निवडणूक आयोगाने महत्त्वाचे वेळापत्रक जाहीर केले आहे. नागरिकांना आपले नाव तपासण्यासाठी आणि दावे व हरकती नोंदवण्यासाठी ३१ ऑगस्ट २०२६ ते ३० सप्टेंबर २०२६ पर्यंतचा कालावधी देण्यात आला आहे. यानंतर सर्व अर्जांची छाननी करून ४ नोव्हेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. १ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी वयाची १८ वर्षे पूर्ण करणारे नवमतदारही यासाठी पात्र ठरणार आहेत.


## Change In Name

My Old Name is **HALEEMA BEE**which now I am changing as New Name **HALIMA BEGUM** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**ADRESS: H.NO.7-1-97 ITWARA BAZAR OPPOSITE QADRI HOSPITAL NANDED**

## Change In Name

My Old Name is **MINHAJKAUSAR** which now I am changing as New Name **MINHAJ KAUSAR** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**ADRESS: H.NO.7-1-97 ITWARA BAZAR OPPOSITE QADRI HOSPITAL NANDED**

## Change In Name

My Old Name is **SHAIKAHMED** which now I am changing as New Name **SHAIKH AHMED** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address-H.NO.7-1-97 ITWARA BAZAR OPPOSITE QADRI HOSPITAL NANDED**

## Change In Name

**I HAVE MY OLD NAME BEFORE MARRIAGE FROM SHAIKH NEELOFARBANO MOHIYODDIN.**

**ADDRESS: AT. POST . GORTHA TQ. UMRI DIST. NANDED- 431805**

**MY NEW NAME AFTER MARRIAGE FROM: NILOFAR BEGUM MOHAMMED AFZAL ADDRESS: H.NO 2860 GANDHI NAGAR BILOLI, TQ. BILOLI**

**DIST. NANDED- 431710**


## आजपासून ज्येष्ठ नागरिक, महिला एसटी प्रवाशांसाठी एनसीएमसी कार्ड अनिवार्य

**मुंबई(प्रतिनिधी)**– महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसमधून प्रवास करणाऱ्या ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांसाठी महत्त्वाची सूचना आहे. १ सप्टेंबर २०२६ पासून शासनाच्या सवलतीचा लाभ घेण्यासाठी ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांना एनसीएमसी कार्ड अनिवार्य करण्यात येणार आहे. या प्रवाशांना सवलतीचे तिकीट छउचउ कार्डच्या माध्यमातूनच देण्यात येणार आहे.

त्यामुळे सवलतीचा लाभ घेणाऱ्या संबंधित प्रवाशांनी प्रवासाच्या वेळी एनसीएमसी कार्ड सोबत ठेवावे, तसेच कार्डमध्ये आवश्यक रक्कम Top-up करून ठेवावी, असे आवाहन एसटी महामंडळाने केले आहे.

# सप्टेंबर महिन्यात बहुतांश जिल्ह्यात पावसाची तूट राहण्याचा अंदाज

**मुंबई(प्रतिनिधी)**—भारतीय हवामान विभागानं सप्टेंबर महिन्यात पावसाची स्थिती कशी राहील यासंदर्भातील अंदाज वर्तवला आहे. सध्या संपूर्ण राज्यात सरासरी पेक्षा पाऊस कमी आहे. प्रत्येक जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला असल्याचं सुषमा नायर यांनी सांगितलं. सप्टेंबर महिन्यात देखील बहुतांश जिल्ह्यात पावसाची तूट अशीच कायम राहील. सध्या एक कमी दाबाचा क्षेत्र निर्माण झालं असून त्यामुळे पूर्व विदर्भात अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे, असं हवामान विभागानं सांगितलं आहे.

प्रत्येक जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. पूर्ण राज्यात सरासरीपेक्षा पाऊस कमी आहे. ऑगस्ट महिन्यात मराठवाड्यात ६९% पावसाची तूट आहे तर विदर्भात ५८% पाऊस कमी झाला तर सरासरी तूट ही ४६% आहे. ऑगस्ट महिन्यात मुंबईत देखील - ३३ टक्के पाऊस झाला कारण अशीच कोणतीही सिस्टीम नव्हती ज्याने पाऊस पडेल, असं सुषमा नायर म्हणाल्या.

एक दोन वेळेला वातावरण निर्माण होण्याची शक्यता होती मात्र महाराष्ट्राच्या अंतर्गत भागात पाऊस पडेल अशी स्थिती निर्माण न झाल्यामुळे पावसाची एवढी तूट सध्या दिसते आहे. पाऊस पडेल अशी स्थिती निर्माण झाली नाही.



जुलै पर्यंत पाऊस चांगला होता कोकण किनारपट्टी वरती अधिक पाऊस झाला म्हणून संपूर्ण पावसाळ्यात थोडाफार पाऊस झाल्याचे दिसते. मात्र, तरी मराठवाडा आणि विदर्भाच्या बहुतेक जिल्ह्यांमध्ये तूट आहे.

सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात देखील परिस्थिती अशीच राहणार आहे, आम्ही कोणताही इशारा दिलेला नाही. सध्या एक कमी दाबाचा क्षेत्र निर्माण झालं असून त्यामुळे पूर्व विदर्भात अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे. अन्यत्र राज्यात परिस्थिती अशीच राहणार आहे.सप्टेंबर महिन्यात देखील बहुतांश जिल्ह्यात पावसाची तूट अशीच कायम राहील. या आधी देखील अशी परिस्थिती अशी परिस्थिती निर्माण झाली आहे, कमी पावसाचा अंदाज याआधीच वर्तवण्यात आला होता, असं हवामान विभागाकडून सांगण्यात आलं आहे.


## टी. सी. हरवली

माझी ज्योती काशिनाथ मंडलवाड या नावाची इयत्ता बी.एड. पासची टी. सी. मध्यवर्ती बसस्थानक नांदेड ते चिखलवाडी कॉर्नर दरम्यान ऑटो प्रवासात हरवली आहे. ज्यांना कोणाला सापडली असेल त्यांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा. संपर्क पत्ता- ज्योती काशिनाथ मंडलवाड रा. सरसम, ता. हिमायतनगर, जि. नांदेड

## पाहिजेत

मोमीन एज्युकेशन सोसायटी सयदान नांदेड द्वारा संचालित इस्लाहूल अमल गर्ल्स ज्युनिअर कॉलेज (उर्दू माध्यम) सयदा नांदेड मध्ये समाजशास्त्र व अर्थशास्त्र या विषयासाठी सहशिक्षकाचे १ पद (४० टक्के) अंशतः अनुदान तत्त्वावर भरणे आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी मूळ शैक्षणिक प्रमाणपत्र व इतर आवश्यक साक्षांकित प्रतिसह (बी.ए., एम.ए., बी. एड.) स्वखर्चाने मुलाखतीस दिनांक ७/९/२०२६ रोजी दुपारी ३ वाजता कॉलेजच्या कार्यालयात उपस्थित राहावे.

**सचिव**
**मोमीन एज्युकेशन सोसायटी,**
**मोहल्ला सय्यदान नांदेड**


## जाहीर प्रगटन

मौजे धनेगाव ता. जि. नांदेड हद्दीतील सर्व्हे नं. ७८/डी/१ (जुना) व ६१/ए/१ (नवा) मधील व्यंकटेश्वरानगर येथील प्लॉट नं. ४३/बी साईज ३० बाय ४० उत्तर-दक्षिण ९.१४ चौरस मीटर व पूर्व-पश्चिम १२.१९ चौरस मीटर. एकूण क्षेत्रफळ १११.४१ चौरस मीटरचा प्लॉट. अविनाश पि. दिगंबरराव मोरे रा. देगाव, ता. नायगाव खै. जि. नांदेड यांचेकडून म. सलीम म. इस्माईलसाब रा. येवती ता. मुखेड, जि. नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

**प्लॉटची चतुःसीमा–**

पूर्वेस - ७.६१ मीटरचा रुंद रस्ता,
पश्चिमेस -प्लॉट नं. ४३ ए,
दक्षिणेस -प्लॉट नं. ४३ सी,
उत्तरेस - प्लॉट नं. ४२ एफ आहे.

तरी वरील चतुःसिमेच्या आतील प्लॉटबद्दल कोणाचा काही हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत म. सलीम म. इस्माईल साब यांच्या नावाने करण्यात येईल करीता हे जाहीर प्रगटन.

**जाहीर प्रगटन देणार**
**म. सलीम म. इस्माईलसाब**
रा. येवती, ता. मुखेड, जि. नांदेड

## जाहीर प्रगटन

मौजे कौठा ता. जि. नांदेड हद्दीतील सर्व्हे नं. १० पैकी २ मधील प्लॉट नं. १२० व १२१ मनपा मालमत्ता क्र. १०/२ वरील शिवसागर प्राईड बी विंग मधील पाचव्या मजल्यावरील सदनिका क्रमांक ५०३ क्षेत्रफळ ४८१ चौरस फुटाची सदनिका श्री गजानन रमाकांत हेंगणे व सौ. अर्चना गजानन हेंगणे रा. जुना कौठा नांदेड यांचेकडून चंद्रकांत गणपती शेटे रा. पिंपरण ता. पूर्णा, जि. परभणी यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

**सदनिकेची चतुःसीमा–**

पूर्वेस - सोसायटीमधील मोकळी जागा आहे, पश्चिमेस - प्लॉट नं. ५०२ आहे, दक्षिणेस -सामाईक पायऱ्या, पॅसेज व लिफ्ट आहे, उत्तरेस - प्लॉट नं. ५०१ आहे.

तरी वरील चतुःसिमेच्या आतील प्लॉटबद्दल कोणाचा काही हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत चंद्रकांत गणपती शेटे यांच्या नावाने करण्यात येईल करीता हे जाहीर प्रगटन.

**मार्फत**
**ॲड. सावित्री जोशी**
रा. सोमेश कॉलनी,
कलामंदिर मागे, नांदेड
मो. ९४२१७६१८९८
९४२००९०१९८

**जाहीर प्रगटन देणार**
**चंद्रकांत गणपती शेटे**
रा. पिंपरण, ता. पूर्णा, जि. परभणी
मो. ९८५०६५६४००


## Change In Name

My Old Name is **UMBARDHALE MAROTIRAO** which now I am changing as New Name **MAROTI GANGARAM UMBARDHALE** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address-AT. BABULGAON TQ. DHARMABAD, POST. YETALA DIST. NANDED, MAHARASHTRA-431809**
**MO. NO. 7350723499**

## Change In Name

My Old Name is **MAHAMMAD FARID MAHAMMAD HUSEIN** which now I am changing as New Name **MAHAMMAD FARID MAHAMMAD HUSAIN.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address - MAHAMMAD FARID MAHAMMAD HUSAIN R/O MADINANAGAR NEAR RAILWAY STATION NYAHALEE ROAD MUDKHED TQ. MUDKHED, DIST. NANDED-431806**
**MAHARASHTRA MO.NO. 9921599750**


## जाहीर प्रगटन

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बिलोली यांचे न्यायालय किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १८०/२०२६

गणेश व्यंकटराव पाटील व इतर वि. निरंक

अर्जदार-१ गणेश व्यंकटराव पाटील वय ५३ वर्षे, २. संजय व्यंकटराव पाटील वय-५० वर्षे, दोघे रा. जिगळा ता. बिलोली, जि. नांदेड ३. प्रयागबाई भ्र. सुभाष पाटील वय- ७२ वर्षे, रा. भोपाळा ता. नायगाव जि. नांदेड, ४. साखराबाई भ्र. धोंडजी जिल्हा गोरटकर वय ४७ वर्षे, रा. सालेगाव ता. धर्माबाद, जि. नांदेड

विरुध्द

निरंक

विषय -वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत व्यंकटराव मारोतराव पाटील यांचे अर्जदार क्र. १ व २ हे मुले आहेत व अर्जदार क्र. ३ व ४ या मुली आहेत. अर्जदार क्र. १ व २ रा. जिगळा ता. बिलोली जि. नांदेड अर्जदार क्र. ३ रा. भोपाळा ता. नायगाव जि. नांदेड अर्जदार क्र. ४ रा. सालेगाव ता. धर्माबाद जि. नांदेड मयत व्यंकटराव मारोतराव पाटील यांचा मृत्यु दिनांक २०/०६/२०२६ रोजी अल्पशा आजाराने त्यांचे राहते गांव जिगळा ता. बिलोली जि. नांदेड येथे झाला. मयत व्यंकटराव मारोतराव पाटील यांचे अर्जदाराव्यतिरिक्त इतर कोणीही वारस नाहीत मयताच्या पश्चात अर्जदार हेय मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत व्यंकटराव मारोतराव पाटील यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत दिनांक ०१/१०/२०२६ रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप / उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दि. २५ ऑगस्ट २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले..

सहा अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क. स्तर,
बिलोली

## जाहीर प्रगटन

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बिलोली यांचे न्यायालय किरकोळ
दिवाणी अर्ज क्रमांक १९३ /२०२६
ललिता प्र. राजेश भोरे व इतर वि. निरंक

अर्जदार : १. ललिता भ्र. राजेश भोरे वय ५१ वर्षे, २. लखन पि. राजेश भोरे वय-२५ वर्षे, ३. मनिषा भ्र. मनोज खंदारे वय-३५ वर्षे, ४. स्नेहा रामप्रसाद करपे वय- ३० वर्षे, ५. ममता भ्र. भास्कर धात्रक वय-२९ वर्षे अर्जदार क्र. १, २ व ४ रा. वंजारगल्लली कुंडलवाडी ता. बिलोली जि. नांदेड. अर्जदार क्र. ३ रा. चावडी, वार्ड क्र. ५. पाहपळ, ता. केलापूर जि. यवतमाळ अर्जदार क्र. ५ रा. देशीपेठ ता. बंसवाडा, जि. कामारेड्डी तेलंगणा.

विरुद्ध निरंक

विषय:- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत राजेश शंकर मोरे यांची अर्जदार क्र. १ ही पत्नी आहे. अर्जदार क्र. २ हा मुलगा आहे. अर्जदार क्र. ३ ते ५ या विवाहीत मुली आहेत. अर्जदार क्र. १, २ व ४ रा. यंजारगावी कुंडलवाडी ता. बिलोली जि. नांदेड अर्जदार क्र. ३ रा. चावडी वार्ड क्र. ५. पाहपळ, ता. केलापुर जि. यवतमाळ अर्जदार क्र. ५ रा. देशीपेठ ता. बंसवाडा जि. कामारेड्डी तेलंगणा मयत राजेश शंकर भोरे यांचे आई वडील यांचा मृत्यु अगोदर झाला आहे. मयत राजेश शंकर भोरे यांचा मृत्यु दिनांक ०८/०८/२०२६ रोजी त्यांचे राहते गांव वंजारगल्ली कुंडलवाडी ता. बिलोली जि. नांदेड येथे झाला. मयत राजेश शंकर मोरे यांचे अर्जदारा व्यतीरिक्त इतर कोणीही वारस नाहीत. मयताच्या पश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत राजेश शंकर भोरे यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत दिनांक ०६/१०/२०२६ रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप / उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दि. २९ ऑगस्ट २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क. स्तर,
बिलोली

विश्वास । सहकार्य । समृध्दी ।।
महासमृध्दी अर्बन सहकारी पतसंस्था मर्यादित जि. नांदेड..

## सभासदाकरीता सभेची नोटीस

**महासमृध्दी अर्बन सहकारी पतसंस्था मर्यादित, नांदेड. ता. जि. नांदेड या संस्थेची नोंदणी दिनांक १४/०८/२०२६ रोजी झाली असून नोदंणी क्रमांक एनएनडी/आरएसआर/सीआर/ ८३४/२०२६ असा आहे. सदर संस्थेची नोदंणी नंतरची पहिली सर्वसाधारण सभा दिनांक ०८/०९/२०२६ रोज मंगळवारी दुपारी ४ वाजता, एकादशी हॉटेल बॅक्वेट हॉल पासदगाव नांदेड येथे आयोजित केली आहे.**

**महासमृध्दी अर्बन सहकारी पतसंस्था मर्यादित,नांदेड. च्या सभेचे अध्यक्ष म्हणून मा. श्री के बी फिसके, उपनिबंधक सहकारी संस्था ता. जि. नांदेड यांची या सभेचे प्राधिकृत अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सदरील सभेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सदर सभेस संस्थेच्या सर्व सभासदांनी उपस्थित रहावे ही विनंती.**

**मुख्य प्रवर्तक**
**गिरीष प्रभाकराव जाधव**
**महासमृध्दी अर्बन सहकारी पतसंस्था**
**मर्यादित जि.नांदेड**


## Change In Name


My Old Name is **MOHD ASIF ABDUL SALEEM** which now I am changing as New Name **MOHAMMED ASIF S/O ABDUL SALEEM.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address - H. No. 8-1-373/2 Fateh Jang Khan Nawab Mandhai Itwara**

## Change In Name

My Old Name is **SEKH SALIM KHURSHIDMINYA** which now I am changing as New Name **SHAIKH SALEEM KHURSHIDMINYA.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address - 2402 Near Munwar Masjeed Bagwan Street Kundalwadi Tq. Biloli Dist. Nanded-431711 Mo. No. 9371464928**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस
महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.



# गोदातीर समाचार



पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308




# मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा

## ‘खेलेगा भारत, जितेगा भारत’च्या घोषवाक्यासह ४५० खेळाडूंचा सामुदायिक रॅलीत सहभाग

**नांदेड (प्रतिनिधी)**–महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या अतुलनीय क्रीडा योगदानाची स्मृती जपण्यासाठी तसेच युवकांमध्ये खेळ व क्रीडा संस्कृतीची आवड निर्माण करण्याच्या उद्देशाने २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन नांदेड जिल्ह्यात उत्साहात साजरा करण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड जिल्हा ऑलिम्पिक असोसिएशन तसेच विविध एकविध क्रीडा संघटनांच्या संयुक्त विद्यमाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त २९ ऑगस्ट रोजी सकाळच्या सत्रात मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थित खेळाडूंना क्रीडा शपथ देण्यात आली. सायंकाळच्या सत्रात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन प्राविण्य संपादन केलेल्या खेळाडूंचा सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी भैरवनाथ नाईकवाडी यांनी खेळाडू व प्रशिक्षकांना राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या शुभेच्छा दिल्या. मैदान आपली वाट पाहत आहे. तुमची मेहनत आणि जिद्द दाखवा. जिंकलात तर विनम्र राहा आणि हरलात तर अधिक शिकून पुन्हा मैदानावर उतरा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच कुटुंबीय व मित्रांना दररोज एक तास खेळ आणि फिटनेस उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून राज्य आपत्ती प्रतिसाद दल, नांदेड कॅम्पचे पोलीस निरीक्षक प्रशांत राठोड उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त जिल्हा क्रीडा अधिकारी गंगालाल यादव, सेवानिवृत्त क्रीडा अधिकारी किशोर पाठक, नांदेड जिल्हा ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. इम्तियाज खान, उपाध्यक्ष विनोद गोस्वामी, सचिव रवी बकवाड, राज्य क्रीडा मार्गदर्शक चंद्रप्रकाश होनवडजकर, क्रीडा अधिकारी राहुल श्रीरामवार, चंद्रकांत पुलकंटवार, विजय गावंडे, पोलीस उपनिरीक्षक सुधीर शिरसाठ आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमास विविध क्रीडा संघटनांचे खेळाडू, प्रशिक्षक, मार्गदर्शक, एकनाथ पाटील अकॅडमीचे प्रतिनिधी व राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचे अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**‘खेलेगा भारत, जितेगा भारत’च्या घोषवाक्याने सामुदायिक रॅली**

राष्ट्रीय क्रीडा दिन सप्ताहाच्या अनुषंगाने ३० ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजता सामुदायिक रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीमध्ये जिल्ह्यातील विविध क्रीडा संघटनांचे खेळाडू, प्रशिक्षक व मार्गदर्शक तसेच एकनाथ पाटील अकॅडमीचे खेळाडू आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचे अधिकारी-कर्मचारी अशा सुमारे ४५० खेळाडूंनी सहभाग घेतला. ‘खेलेगा भारत, जितेगा भारत’ या घोषवाक्याने रॅली उत्साहात संपन्न झाली.

संपूर्ण कार्यक्रम जिल्हा क्रीडा अधिकारी भैरवनाथ नाईकवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमप्रमुख क्रीडा अधिकारी संजय बेतीवार यांच्या नेतृत्वात यशस्वीपणे पार पडला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राज्य क्रीडा मार्गदर्शक चंद्रप्रकाश होनवडजकर, क्रीडा अधिकारी राहुल श्रीरामवार, संजय चव्हाण, हनमंत नरवाडे, इक्रम शेख, मोहन पवार, सुभाष धोंगडे, विद्यानंद भालेराव, चंद्रकांत गव्हाणे, यश कांबळे, सोनबा ओव्हाळ आदींनी सहकार्य केले.

# गोदावरी पात्रात ग्रामीण पोलिसांचा सलग दुसरा छापा; ३३.५१ लाखांचा मुद्देमाल जप्त, तीन दिवसांत ५३ लाखांची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)** –अवैध रेती उपशाविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलिसांनी धडक मोहीम सुरूच ठेवली असून, नागापूर शिवारातील गोदावरी नदीपात्रात छापा टाकून ३३ लाख ५१ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तीन दिवसांत ग्रामीण पोलिसांनी ४ कारवायांत तब्बल ५३ लाख ४१ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत दि. ३० ऑगस्ट रोजी ग्रामीण पोलीस पथक पेट्रोलिंग करीत असताना नागापूर शिवारात बोटी व तराफ्यांच्या सहाय्याने अवैध रेती उपसा सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली. पंचासह पथकाने सायंकाळी छापा टाकताच ३ ते ४ जण नदीत उडी मारून पलीकडे पळून गेले.

पथकाने २ मोठ्या लोखंडी बोटी- ३० लाख (जागेवर नष्ट), ५ तरंगणारे तराफे- २.५० लाख (जागेवर नष्ट), ३) तराफ्यांवरील १० ब्रास वाळू- ५० हजार जप्त (तराफे जागेवर नष्ट), घटनास्थळी साठवलेली १० ब्रास वाळू- ५० हजार, ५ मोठे टोपले व ३ खोरे- १ हजार ९०० रुपये असा एकूण ३३ लाख ५१ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याप्रकरणी ४ अनोळखी आरोपींविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गु.र.नं. १०८३/२०२६ अन्वये BNS कलम ३०३(२), ३(५), महाराष्ट्र जमीन महसूल संहिता ४८(७)(८), पर्यावरण संरक्षण अधिनियम ९, १५ आणि सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम ३ व ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, दि. २८ ते ३० ऑगस्ट या तीन दिवसांत नांदेड ग्रामीण पोलिसांनी अवैध रेती व अवैध धंद्यांविरुद्ध ४ स्वतंत्र कारवायांत सुमारे ५३ लाख ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने पो.नि. ओमकांत चिंचोलकर यांच्या नेतृत्वाखाली पोउपनि व्यंकट कुसमे, अंमलदार भगवान टिपसरे, भिसे, तेलंग, गफार शेख, कल्याणकर, पवार यांनी पार पाडली.



**नांदेड–** जिल्हाधिकारी कार्यालयातील गौण खनिज विभागात तेलंगणातील वाळू ठेका घेणाऱ्या व्यापाऱ्यासोबत हदगाव तहसील कार्यालयात कार्यरत असलेल्या एका कर्मचाऱ्याने तब्बल दोन तास चर्चा केली. या चर्चेमागील गुपित काय आहे? हे अद्याप समजले नसून विशेष म्हणजे हा तेलंगणातील वाळूमाफिया एका शासकीय कर्मचाऱ्यांच्या खुर्चीत बसून दिमाखात हदगाव येथील कर्मचाऱ्यासोबत चर्चा करत आहे. या प्रकरणाची माहिती मागील काही दिवसांपासून तक्रारकर्ता मागत असतानाही जिल्हाधिकारी कार्यालयाकडून संबंधित कर्मचाऱ्यावर कारवाई होण्यास टाळाटाळ करण्यात येत असल्याचा आरोप तक्रारकर्त्याने केला आहे.

# तिसऱ्या श्रावण सोमवारी काळेश्वर मंदिरात दर्शनासाठी भाविकांची गर्दी

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड तालुक्यातील शहरापासून जवळच असलेल्या लाखो भाविक-भक्तांचे व श्रद्धास्थान असलेल्या तीर्थक्षेत्र काळेश्वर मंदिरात श्रावण मास तिसऱ्या सोमवार निमित्त ३१ ऑगस्ट रोजी पंचक्रोशीतील हजारो भाविक-भक्तांनी दर्शन घेतले. यावेळी महादेवाचा गजर करत दर्शन रांगेत जय काळेश्वर भगवान की जय, बम बम बोले, हरहर महादेव की जय आदी घोषणा देण्यात आल्या. रात्री १२ वाजता महाअभिषेक, संध्याकाळी गोदावरी माता व काळेश्वर आरती आयोजित केली होती. यानंतर हजारो भाविक-भक्तांनी दर्शन घेतले.



काळेश्वर मंदिर विश्वस्त समितीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्रावण मास निमित्ताने दुसरा सोमवार ३१ ऑगस्ट रोजी भाविक-भक्तांची दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी पाहता दर्शनासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती तर ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी मोठ्या प्रमाणात अधिकारी, पोलीस अंमलदार, महिला पोलीस, होमगार्ड यांचा चोख बंदोबस्त लावण्यात आला होता. श्रावण महिन्यात तिसऱ्या सोमवारी ३१ ऑगस्ट रोजी सकाळी विश्वस्त समिती पदाधिकारी यांच्या हस्ते व पुजारी रामेश्वर लिंगप्पा धणमणे स्वामी, सतीश धनमणे स्वामी, राम धनमणे यांच्या विधीवत व मंत्रोच्चाराने महाअभिषेक, महापूजा, महाआरती तर सायंकाळी गोदावरी माता नदीच्या काठावर महाआरती व काळेश्वर मंदिरात संध्याकाळी आरती आयोजित करण्यात आली होती व श्रावणमास निमित्ताने दैनंदिन दुपारपासून भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

श्रावणमासात महिनाभर व दुसऱ्या सोमवार निमित्ताने होणारी भाविकांची गर्दी पाहता वाहनतळ यासह भाविक भक्तांसाठी पिण्याचे पाणी, दर्शन रांग आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती तर उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या आदेशानुसार दोन पोलीस निरीक्षक अधिकारी, सपोनी उपनिरीक्षक ११, पोलीस अंमलदार, महिला पोलीस कर्मचारी ९०, होमगार्ड, महिला होमगार्ड ६५ यांची नेमणूक करण्यात आली होती. गोदावरी नदी किनाऱ्यावर जीवरक्षक दल तैनात करण्यात आले होते.

# गणपतराव बोईनवाड यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–** नायगाव (बा.) तालुक्यातील होटाळा येथील ज्येष्ठ नागरिक गणपतराव सिताराम बोईनवाड यांचे सोमवार, दि. ३१ ऑगस्ट रोजी पहाटे ३ वाजता निधन झाले. ते अनेक दिवसांपासून विविध आजाराने ग्रस्त होते. अहमदनगर येथील विखे पाटील हॉस्पिटल येथे उपचार चालू असताना वयाच्या ८५ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात ४ मुले, १ मुलगी, नातू, नातवंडे असा परिवार आहे.

# श्रीमती प्रभा पांडे यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)–** वाडी बु. येथील लईजाईनगरीतील ज्येष्ठ महिला श्रीमती प्रभा भास्करराव पांडे (७८) यांचे अल्पशा आजाराने रविवार, दि. ३० ऑगस्ट रोजी राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गोवर्धनघाट येथील शांतीधाम स्मशानभूमीत सोमवार, दि. ३१ ऑगस्ट रोजी दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. मेडिकल प्रतिनिधी (एमआर) विजय, संजय व डॉ. मंगेश पांडे यांच्या त्या मातोश्री होत.

# बंटी लांडगे यांचा ‘युवा समाजरत्न’ पुरस्काराने गौरव




**नांदेड (प्रतिनिधी)–** आंबेडकरी चळवळीचे युवा नेते आनंद उर्फ बंटी लांडगे यांना सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल ‘महाराष्ट्र राज्य युवासमाजरत्न पुरस्कार’ देऊन गौरविण्यात आले. दै. सम्राटचे कार्यकारी संपादक कुणाल बबन कांबळे यांच्या हस्ते रविवार, दि. ३० ऑगस्ट २०२६ रोजी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी भदंत पय्याबोधी महाथेरो, प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार, दै. सम्राटचे जिल्हा प्रतिनिधी संभाजी कांबळे, डॉ. फुगारे, रमेश सोनाळे, सुभाष कटकांबळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती होती.

गोरगरीब व गरजू रुग्णांच्या मदतीसाठी लांडगे यांनी मोफत रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली आहे. तसेच अनाथ व निराधारांना ते नेहमीच आधार देतात. नागरिकांची पाण्याची गरज लक्षात घेऊन त्यांनी स्वखर्चातून शहरातील विविध भागांत बोअरवेल करून दिल्या आहेत. त्यांच्या या सामाजिक उपक्रमांची दखल घेऊन सदर पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.




**नांदेड –** महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांतर्गत थकीत देयकांमुळे कंत्राटदार कै. गजानन देवकत्ते व कंत्राटदार कै. दयानंद हुल्ले यांनी शासनाकडील प्रलंबित देयकांना कंटाळून केलेल्या आत्महत्यांचा बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया नांदेड सेंटर व महाराष्ट्र इंजिनिअर्स असोसिएशन शाखा नांदेड तसेच महाराष्ट्र शासकीय कंत्राटदार फेडरेशनच्यावतीने असंवेदनशील महाराष्ट्र शासनाचा जाहीर निषेध करत निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी बाबूराव शक्करवार, एस. एस. पळशीकर, अविनाश रावळकर, सुनील जोशी, ओम वटमे, इंजि. एम. ए. हकीम, व्ही. व्ही. मामीडवाड, प्रवीण जाधव, विनोद गंदेवाड, सोहेल अन्सारी, अजय माळवे आदी दिसत आहेत. (छाया : ज्ञानेश्वर सुनेगावकर)

# नांदेड-बेंगळुरू एक्स्प्रेसमध्ये कायमस्वरूपी डब्यांची वाढ

**नांदेड (प्रतिनिधी)**–प्रवाशांची वाढती मागणी लक्षात घेऊन दक्षिण पश्चिम रेल्वेच्या गाड्यांमध्ये कायमस्वरूपी डब्यांची वाढ करण्यात आली आहे. त्यानुसार गाडी क्रमांक १६५९३/१६५९४ एसएमव्ही बेंगळुरू-नांदेड-बेंगळुरू एक्स्प्रेसच्या संरचनेत कायमस्वरूपी वाढ करण्यात आली आहे.

या गाडीच्या विद्यमान १८ डब्यांच्या तुलनेत २ अतिरिक्त तृतीय श्रेणी वातानुकूलित डबे वाढविण्यात आले असून, गाडीची सुधारित डब्यांची संख्या २० झाली आहे. सदरील वाढ बेंगळुरू येथून १ सप्टेंबर २०२६ पासून, तर नांदेड येथून ३ सप्टेंबर २०२६ पासून लागू होईल. या कायमस्वरूपी डबेवाढीमुळे नांदेड-बेंगळुरू मार्गावरील प्रवाशांना अतिरिक्त आसन क्षमता उपलब्ध होणार असून, प्रवाशांना अधिक सुविधा मिळण्यास मदत होणार आहे.

प्रवाशांनी आरक्षणासाठी अधिकृत रेल्वे संकेतस्थळ, रेल्वे आरक्षण केंद्रे किंवा RailOne ॲपचा वापर करावा, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

# देगलूर पोलिसांचा जुगार अड्ड्यावर छापा; हावरगा येथे ७ जुगाऱ्यांना रंगेहात पकडले, २ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**–नांदेड जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत देगलूर पोलिसांनी नवीन हावरगा येथे सुरू असलेल्या ‘तिर्रट’ जुगार अड्ड्यावर छापा टाकून ७ जणांना रंगेहात पकडले आहे. या प्रकरणी २ लाख ३३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने देगलूर पोलीस ठाणे हद्दीत अवैध धंद्यांविरुद्ध मोहीम सुरू आहे. दि. ३० ऑगस्ट रोजी पोउपनि हनमंत शिंदे यांचे पथक पेट्रोलिंग करीत असताना नवीन हावरगा येथील पडित अंगणवाडीसमोरील मोकळ्या जागेत काही जण ‘तिर्रट’ जुगार खेळत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. माहितीच्या आधारे पथकाने छापा टाकला असता सात जण जुगार खेळताना आढळले.



पोलिसांनी ज्ञानेश्वर अर्जुन जांभळे (वय ३७, रा. बामणी, मुखेड), अनिल माधव गवलवाड (वय ३०, रा. नवीन मुजळगा), अशोक यादवराव (वय ३५, रा. नवीन हावरगा), साहेबराव हनमंत ढवळे (वय ३६, रा. नवीन हावरगा), शुद्धोधन उर्फ सिद्धार्थ कांबळे (वय ३२, रा. नवीन मुजळगा), सायलू यादव बरसमवार (वय २८), रा. नवीन हावरगा) आणि भीमराव विठ्ठलराव बरसमवार (वय ३५, रा. नवीन हावरगा) यांना अटक केली आहे.

घटनास्थळावरून पंचासमक्ष रोख ५ हजार ३३० रुपये, जुगाराचे पत्ते आणि तीन दुचाकी (१ लाख ९५ हजार रुपये) असा एकूण २ लाख ३३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी देगलूर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ४०४/२०२६ अन्वये महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम १२(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, अपर अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय अधिकारी श्याम पानेगावकर, परि. उपअधीक्षक वैभव पडवळ, पोलीस निरीक्षक सूर्यमोहन बोलमवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि हनमंत शिंदे, अंमलदार किरणकुमार वाघमारे आणि विशाल अटकोरे यांनी पार पाडली.

# धनगर आरक्षणासाठी सरकारला पुन्हा इशारा; १७ सप्टेंबरला ‘एल्गार मेळावा’

**नांदेड (प्रतिनिधी)–** धनगर समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गातून आरक्षण लागू करण्याच्या अंमलबजावणीसाठी राज्यात पुन्हा एकदा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा धनगर समाजाच्या वतीने देण्यात आला आहे. नांदेड येथे पार पडलेल्या धनगर समाजाच्या बैठकीत या आंदोलनाची अधिकृत घोषणा करण्यात आली. या निर्णयानुसार येत्या १७ सप्टेंबर रोजी परभणी येथे एल्गार मेळावा व आंदोलन आयोजित केले जाणार आहे.

यावेळी बोलताना आंदोलकांनी तत्कालीन आणि वर्तमान सरकारवर जोरदार टीका केली. २०१४ मध्ये सोलापूर येथील सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आम्हाला सत्ता द्या, आम्ही आरक्षण देतो, असे आश्वासन दिले होते. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही पहिल्याच कॅबिनेटमध्ये धनगर आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावू, असे जाहीर केले होते. मात्र, १० ते १२ वर्षे उलटून गेल्यानंतरही या आश्वासनांची पूर्तता झालेली नाही. सरकार केवळ आश्वासने देऊन धनगर समाजाची फसवणूक करत असल्याचा थेट आरोप बैठकीत करण्यात आला. नांदेडमधील बैठकीत झालेल्या या घोषणेमुळे आगामी काळात धनगर आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा राज्यात तापण्याची चिन्हे दिसत आहेत. दरम्यान वारंवार आंदोलने करूनही केवळ आश्वासनांचे गाजर दाखवले जात आहे. त्यामुळे आता सरकारला धनगरी हिसका दाखवण्याची वेळ आली आहे, असा इशारा धनगर समाज आंदोलक दीपक बोराडे यांनी दिला.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com